|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ११ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेत शक्षणिक वर्ष २४ – २५ साठी बीटेक प्रथमवर्ष अभियांत्रिकी/तांत्रिकीच्या तसेच बीटेक थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी/तांत्रिकीच्या काही जागा रिक्त आहेत. त्या रिक्त जागांसाठी □च्छुक विद्यार्थ्यांना अनुक्रमे दि. १२ व १३ सप्टेंबर २०२४ रोजी दु. १२ वाजेपर्यंन्त संस्थेत अर्ज करण्याची मुदत देण्यात आलेली आहे. असे संस्थेचे संचालक अ.के गोस्वामी यांनी कळविलेले आहे. सदर रिक्त जागांची परिपूर्ण माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना/पालकांना आवाहन करण्यात येते की अधिक माहितीसाठी या संस्थेतील डॉ. पवन डी.मेश्राम, समन्वयक (मोबाईल क्र. ८०८७२७६९२२) किंवा डॉ.आर.एस.सिरसाम समन्वयक (मोबाईल क्र. ८८०६६७१३६९) यांचेशी संपर्क साधावा.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ११ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

जळगाव, दि. १० (प्रतिनिधी) : जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या पथनाट्याला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.

जागतिक आरोग्य संघटनेकडून दि. १० सप्टेंबर हा जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिवस म्हणून साजरा केला जातो. आत्महत्येला प्रतिबंध बसावा व विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी यासाठी मानसशास्त्र विभागाच्या वतीने विद्यापीठ परिसरातील विविध प्रशाळांच्या परिसरात पथनाट्य सादर केले. त्यासोबतच आत्महत्या रोखण्यासाठी विविध मदत केंद्र, समुपदेशक, मानसोपचार तज्ज्ञ यांची मदत घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पथनाट्य सादरीकरण प्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. □ंगळे, मानव्य विद्या शाखेचे अधिष्ठाता प्रा. जगदीश पाटील, कला व मानव्य विद्या प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ. रामचंद्र भावसार, मानसशास्त्र विभागातील डॉ. विना महाजन आदी उपस्थित होते.

## बातमी क्र. २

जळगाव, दि. १० (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेत प्रवेशीत बी.टेक. प्रथमच्या विद्यार्थ्यांसाठी □डक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दि. ९ ते २१ सप्टेंबर पर्यंत हा कार्यक्रम होणार आहे.

संस्थेचे संचालक प्रा.ए.के. गोस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. प्रास्ताविक प्रा.विकास पाटील यांनी केले. विविध अभ्यासक्रमांचे विभाग प्रमुख प्रा.आर. पी. गोरे, प्रा.जे.एस. नारखेडे, प्रा. विशाल पराते, प्रा.पी.डी. मेश्राम, प्रा. जी.ए. बाठे, प्रा.आर.एस. सिरसाम यांनी विभागाची माहिती दिली. संचालक प्रा. ए.के. गोस्वामी यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांसाठी संस्था कटीबध्द असल्याचे सांगितले. प्रा. दिपाली भोळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रा. विनित काकडे यांनी आभार मानले. या □न्डक्शन कार्यक्रमात विविधि क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना नेणार आहे

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १० सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १० (प्रतिनिधी) : नियोजन करुन शेती केली तर त्यामध्ये मोठे भवितव्य असून विद्यार्थ्याने शेतीची सर्व माहिती घेऊन तंत्रज्ञान आत्मसात करत शेतीकडे वळायला हरकत नाही असे प्रतिपादन कृषी विषयातील तज्ज्ञ पत्रकार शैलेंद्र चव्हाण यांनी केले.

कवयित्रि बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने क□डॉ.पंजाबराव देशमुख ऑनलाईन व्याख्यानमालेत शैलेंद्र चव्हाण हे शेती आणि विद्यार्थी या विषयावर बोलत होते. शेतकरी कल्याण विश्वस्त संस्था, नवी दिल्ली यांनी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून या व्याख्यानमालेचे आयोजन विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी व्यवस्थापन परिषद सदस्य नितीन झाल्टे होते. शैलेंद्र चव्हाण म्हणाले की, शेतीचा शोध महिलांनी लावला. पुढे चाकाचा शोध लागल्यावर विकसनशीलतेकडे शेतीचा प्रवास सुरु झाला. वेगवेगळे प्रयोग शेतीत केले गेले. मात्र अलिकडच्या काळात पाण्याचा उपसा मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. ऊस आणि त्यापाठोपाठ केळीला जास्त पाणी लागते. पाण्याच्या या अती वापरामुळे जमिनीचा पोत धोक्यात आला आहे. पुढील १५ ते २० वर्षात या जमीनी टिकणार नाहीत. जमीन हा पिकांचा गर्भ आहे. जमिनी टिकण्यासाठी फार प्रयत्न केले जात नाही. तरुणांनी पाण्याचा उपसा कमी व्हावा यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी शेतीची संपुर्ण माहिती अवगत करावी. तंत्रज्ञान आत्मसात करावे. कोरोनाच्या काळात व नंतर अनेक शिकलेले तरुण शेतीकडे ओढले गेले. शेतीत मोठे भवितव्य आहे. शेतीसोबतच पुरक उद्योग करण्यावर भर द्यावा. उत्पादन विक्रीसाठी सोशल मिडीयाचा वापर करावा असे सांगतांना त्यांनी □स्त्राईल मधील शेतीची उदाहरणे दिली. देश केवळ कृषी प्रधान आहे असे म्हणून उपयोगाचे नाही तर शेतकऱ्यांचा या देशात सन्मान होणे गरजेचे आहे असेही ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात नितीन झाल्टे यांनी हे विद्यापीठ शेतकरी, कष्टकरी, आणि आदिवासी विद्यार्थ्यांचे आहे. शेती आणि माती हा विद्यापीठाचा जिव्हाळ्याचा विषय आहे.शेतीशी नाळ तोडता कामा नये असे मत व्यक्त केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.जयेंद्र लेकुरवाळे यांनी प्रारंभी प्रास्ताविक केले व शेवटी आभार मानले.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १० सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ११ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेत शक्षणिक वर्ष २४ – २५ साठी बीटेक प्रथमवर्ष अभियांत्रिकी/तांत्रिकीच्या तसेच बीटेक थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी/तांत्रिकीच्या काही जागा रिक्त आहेत. त्या रिक्त जागांसाठी च्छुक विद्यार्थ्यांना अनुक्रमे दि. १२ व १३ सप्टेंबर २०२४ रोजी दु. १२ वाजेपर्यंन्त संस्थेत अर्ज करण्याची मुदत देण्यात आलेली आहे. असे संस्थेचे संचालक अ.के गोस्वामी यांनी कळविलेले आहे. . सदर रिक्त जागांची परिपूर्ण माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना/पालकांना आवाहन करण्यात येते की अधिक माहितीसाठी या संस्थेतील डॉ.पवन डी.मेश्राम, समन्वयक (मोबाईल क्र. ८०८७२७६९२२) किंवा डॉ.आर.एस.सिरसाम समन्वयक (मोबाईल क्र. ८८०६६७१३६९) यांचेशी संपर्क साधावा.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ — दिनांक: ११ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने उद्या मंगळवार दि. १० सप्टेंबर रोजी कै.डॉ.पंजाबराव देशमुख व्याख्यानमालेअंतर्गत पत्रकार शैलेंद्र चव्हाण यांचे ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

मंगळवारी सकाळी ११ वाजता अॅग्रोवर्ड मासिकाचे संपादक शैलेंद्र चव्हाण हे शेती विषयावर संवाद साधणार आहेत. या ऑनलाईन व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी व्यवस्थापन परिषद सदस्य नितीन झाल्टे राहणार आहेत. अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी दिली.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ९ सप्टेंबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ६ (प्रतिनिधी) : दिव्यांग विद्यार्थ्यांना ३% गुणांची सवलत देण्याबाबत अध्यादेश बनविण्यासाठी अधिष्ठाता मंडळ व विद्यापरिषदेने केलेली शिफारस कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्य केली असून कुलपती तथा राज्यपालांकडे ही शिफारस पुढील मान्यतेसाठी पाठविली जाणार आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक दि. ५ सप्टेंबर रोजी कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. दिव्यांग विद्यार्थ्यांना ३% गुणांची सवलत देण्याबाबत शासनाच्या पत्राच्या अनुषंगाने चर्चा झाली. विद्यापीठाने या संदर्भात अध्यादेश तयार केला तो यापुर्वी अधिष्ठाता मंडळ व विद्यापरिषदेत मान्य करून व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात आला व तो मान्य करण्यात आला. या अध्यादेशानुसार विद्यापीठाच्या लेखी, प्रात्यक्षिक आदी परीक्षांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यास तो एक किंवा अनेक विषयास अनुत्तीर्ण होत असल्यास त्यास उत्तीर्ण होण्यासाठी लागणारे गुण हे त्या परीक्षेकरीता असेलेल्या एकूण गुणांच्या ३% एवढे गुणांपर्यंतचे गुणदान त्यास मिळेल. तसेच जर एखाद्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी एकूण गुणांच्या पैकी किमान गुण आवश्यक असल्यास व त्यावेळी देखील एकूण गुणांच्या ३% एवढे गुणांचे गुणदान दिव्यांग विद्यार्थ्यास प्राप्त होईल. हे ३% गुण एकाच विषयात किंवा अनेक विषयात विभागून देण्यात येतील या अध्यादेशाची कार्यवाही परीक्षेचा निकाल तयार करतांना केली जाईल. हा संमत झालेला अध्यादेश अंतीम मंजूरीसाठी कुलपती तथा राज्यपालांकडे पाठविण्यात येणार आहे.

विद्यापीठ अंतर्गत विशारद कौशल्य विकास केंद्रामार्फत आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजणेसाठी सामंजस्य करार करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. यामध्ये पाचशेपेक्षा अधिक कोर्स विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत. याच केंद्रामार्फत एमकेसीएल अंतर्गत iLIKE हा नवीन कोर्स सुरु करण्यास देखील या बैठकीत मान्यता देण्यात आली. नंदुरबार येथील विद्यापीठाच्या आदिवासी अकादमीत ऑनलाईन परीक्षा केंद्र तसेच इतर शैक्षणिक प्रकल्प सुरु करण्याबाबत या बैठकीत चर्चा झाली.

या बैठकीत प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, राजेंद्र नन्नवरे, प्रा. अनिल डोंगरे, प्रा. एस.टी. भुकन, प्रा. म.सु. पगारे, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. सुरेखा पालवे, नंदकुमार बेंडाळे, ॲड अमोल पाटील, नितीन झाल्टे, प्रा. महेंद्र रघुवंशी, डॉ. पवित्रा पाटील, डॉ. संदीप पाटील, सीए रवींद्र पाटील, प्रा. योगेश पाटील उपस्थित होते. या बैठकीत शिक्षक दिनानिमित्त कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांचे स्वागत करण्यात आले. बैठकीचे सूत्रसंचालन कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी केले.

**बातमी क्र. २**

जळगाव, दि. ६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा झाला.

गुरवार दि. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून संगणकशास्त्र प्रशाळेत 'सायबर सुरक्षेचा संदेश' असलेले बिल्ले व शुभेच्छा पत्र विद्यार्थ्यांनी तयार करून वितरीत केले. यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा. आर.जे. रामटेके यांनी विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्व पटवून दिले. विद्यार्थी मयूर बंडे याने मनोगत तर प्रणित मराठे याने आभार मानले. यावेळी प्रशाळेतील सायबर व्हॉरीअर क्लब मधील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी प्रा.एस.आर. कोल्हे, प्रा.राजू आमले, प्रा. सुरेंद्र कापसे, प्रा. संदीप भामरे, प्रा. स्नेहलता शिरूडे व प्रशाळेतील इतर शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ६ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या माध्यमातून सुरू असलेल्या अकरा पदव्युत्तर पदवी बहि:स्थ शिक्षणक्रमांच्या स्वयं अध्ययन साहित्य पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरु प्रा. व्ही. एल्. माहेश्वरी यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारा पार पडले.

मराठी, हिंदी, इंग्लिश, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, संरक्षण व सामरिकशास्त्र, शिक्षणशास्त्र, समुपदेशन मानसशास्त्र, एम्. कॉम्. या अकरा बहि:स्थ शिक्षणक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू करण्यात आले असून त्यानुसार सत्र पद्धतीनुसार अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. बहि:स्थ शिक्षणक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी स्वयं अध्ययन साहित्य (SLM) उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे. त्याची गुणवत्ता व दर्जा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानप्राप्तीसाठी प्रेरित करीत असतो. ही बाब लक्षात घेऊन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने ह्या अकरा बहि:स्थ शिक्षणक्रमांसाठी स्वयं अध्ययन साहित्य पुस्तकांची निर्मिती केली आहे. एकूण १९० स्वयं अध्ययन साहित्य पुस्तकांची निर्मिती गेल्या दीड वर्षापासून सुरू होती. त्यापैकी प्रथम वर्षाच्या दोन्ही सत्रांच्या एकूण १०१ पुस्तकांचे काम पूर्णत्वास गेले असून त्यांच्या प्रकाशनाचा कार्यक्रम कुलगुरु प्रा. व्ही. एल्. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्यप्रणालीद्वारा नुकताच पार पडला.

एकूण १२२ लेखक आणि संपादक यांनी घेतलेल्या परिश्रमातून ही पुस्तके सिद्ध झाली आहेत. उत्कृष्ट अध्ययन साहित्य उपलब्ध करून देणे हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्त्वाचा भाग असल्याचे कुलगुरु प्रा. माहेश्वरी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नमूद केले. बहि:स्थ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाणारी ही पुस्तके ज्यांना नियमितपणे महाविद्यालय वा विद्यापीठ येथे जाऊन शिक्षण घेणे शक्य नाही त्यांच्यासाठी मोलाचे काम करू शकते. या माध्यमातून शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या समाजातील काही घटकांपर्यंत विद्यापीठ पोहचत आहे याचे आम्हांला समाधान आहे असेही त्यांनी सांगितले. स्वयं अध्ययन साहित्य पुस्तकांचे लेखक व संपादक असे एकूण ८० अध्यापक या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यापैकी लेखकांच्या वतीने डॉ. ऊर्मिला पाटील (जळगाव), प्राचार्य डॉ. विजय जाधव (थाळनेर), डॉ. इंदुमती भारंबे(जळगाव) यांनी तर संपादकांच्या वतीने प्रा. मुक्ता महाजन (जळगाव) व डॉ. प्रमोद बियाणी (नाशिक) यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ह्या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. एस्. टी. इंगळे, कुलसचिव प्रा. विनोद पाटील, अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाचे संचालक प्रा. समीर नारखेडे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य एस्. एस्. राजपूत, आंतरविद्याशाखीय विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य एस्. टी. भुकन हे दूरदृश्यप्रणालीद्वारा उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. मनीषा जगताप यांनी केले.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ५ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

जळगाव, दि. ४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील संगणकशास्त्र प्रशाळेत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी एम.सी.ए. प्रथमवर्ष अभ्यासक्रम प्रवेशासाठी रिक्त जागांसाठी इच्छुक विद्यार्थ्यांना ०५ सप्टेंबर ते दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत प्रत्यक्ष हस्तलिखीत अर्ज मागविले आहेत. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दि. ११ सप्टेंबर २०२४ रोजी प्रत्यक्ष प्रवेश देण्यात येईल.

संगणकशास्त्र प्रशाळेत रिक्त जागांची माहिती व प्रवेश वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना/पालकांना आवाहन करण्यात येते की अधिक माहितीसाठी या प्रशाळेतील प्रा. अजय पाटील (मोबाईल क्र. ९४२३९७५२१५) व प्रा. संदीप भामरे (मोबाईल क्र. ९८५००९७३१८) यांचेशी संपर्क साधावा. असे संचालक प्रा. राकेश रामटेके यांनी कळविले आहे.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ४ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

जळगाव, दि. ४ (प्रतिनिधी) : सध्याचा विद्यार्थी हा केवळ विद्यार्थी न रहाता परीक्षार्थी झाला असल्यामुळे परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांवर ताण तणाव येत आहेत. ते टाळायचे असेल तर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये नियमित वर्ग करण्याची आणि वर्गात मानसिक दृष्ट्या अध्यापन ग्रहण करण्याची गरज आहे असे प्रतिपादन कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने परीक्षांचे कामकाज सांभाळणा-या महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी ताण-तणाव मुक्त / कॉपी मुक्त परीक्षा अभियान कार्यशाळा बुधवार दि. ४ सप्टेंबर रोजी घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन करतांना कुलगुरु प्रा.माहेश्वरी बोलत होते. यावेळी मंचावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील, मानसशास्त्र विभागाच्या डॉ.वीणा महाजन, विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, गणित शास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.के.एफ.पवार उपस्थित होते.या कार्यशाळेत ९५ प्राध्यापक सहभागी झाले होते.

प्रा.माहेश्वरी यांनी तणावमुक्त व कॉपीमुक्त परीक्षेविषयी सविस्तर भुमिका मांडली. ते म्हणाले की एकविसाव्या शतकात मानसिक आरोग्य चांगले ठेवण्याचे मोठे आव्हान आपल्यासमोर उभे आहे. बदलती जीवनशैली, वाढती स्पर्धा,कामगीरी, चिंता आणि वाढत्या अपेक्षा यामुळे विद्यार्थी तणावात असतो. परीक्षा तशा पाहिल्यातर सोप्या असतात मात्र विद्यार्थी हा वर्गात हजर राहत नाही. केवळ परीक्षेपुरता जात असल्यामुळे तो परीक्षार्थी झाला आहे. शारीरिक व मानसिक दृष्ट्या नियमित वर्गात हजर राहुन शिकविलेले ग्रहण केले तर तणाव येणार नाही. त्यामुळे विद्यार्थी कॅम्पसमध्ये आणि त्यानंतर वर्गात हजर कसा राहील याकडे सर्वांनी लक्ष देण्याची गरज आहे. त्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आवडेल अशा पध्दतीने शिकवावे. गरज असेल तेथे अध्यापनाची पध्दत बदलावी लागेल. केवळ चोवीस मिनीटे ऐकण्याची आणि ऑडिओ अथवा व्हिडीओ अडीच मिनीटे पहाण्याची क्षमता राहिली असल्याचे निदर्शनास आले आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांवरील ताण दुर करण्यासाठी प्रयत्न करावे. त्यासोबतच परीक्षा कॉपीमुक्त होण्यासाठी विद्यार्थ्यांना समजावून सांगावे असे कुलगुरु प्रा. माहेश्वरी म्हणाले. वर्गात चांगले अक्षर आणि उत्तरपत्रिकेचे प्रेझेंन्टेशन चांगले असले तर उत्तरपत्रिका तपासणाऱ्या व्यक्तीवर सकारात्मक परिणाम होऊन गुणांमध्ये निश्चित फरक पडतो. क्रमाने सगळे प्रश्न सोडवायला विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे. अशा काही टिप्स प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना द्याव्यात असे प्रा. माहेश्वरी यांनी सांगितले.

या कार्यशाळेत संचालक प्रा.योगेश पाटील यांनी पहिल्या सत्रात परीक्षेसंदर्भात माहिती दिली. विद्यार्थ्यांना परीक्षा सवयीचा भाग करा ज्यामुळे त्यांना ताण येणार नाही.. उत्तरपत्रिकेवर कोणत्याही प्रकारच्या खुणा करु नयेत. केल्यास होणा-या शिक्षेची विद्यार्थ्यांना माहिती द्यावी. आसन क्रमांक निट टाकण्याची सूचना कनिष्ठ पर्यवेक्षकांनी विद्यार्थ्यांना द्यावी.गुणपत्रिकेतील विविध नोंदी विद्यार्थ्यांना समजावून सांगाव्यात. असे प्रा.योगेश पाटील यांनी सांगितले. दुसऱ्या सत्रात प्रा. वीणा महाजन यांनी विद्यार्थ्यांचा मानसिक ताण तणाव कसा दुर करावा या बाबत प्राध्यापकांना मार्गदर्शन केले.प्रारंभी डॉ.जयेंद्र लेकुरवाळे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा.प्रशांत पाटील यांनी केले. मच्छिंद्र पाटील यांनी आभार मानले.

**बातमी नं. २**

जळगाव, दि. ४ (प्रतिनिधी) : महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना जाहीर केली असून या योजनेअंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये २२ विद्यार्थी प्रशिक्षणार्थी म्हणुन रुजु झाले आहेत. एकुण २९ विद्यार्थ्यांना नेमणूक करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. उर्वरीत विद्यार्थी लवकरच प्रशिक्षणार्थी म्हणून रुजु होतील.

महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना जाहीर केली आहे. या योजनेत सहा महिन्यांसाठी शासकीय कार्यालयांमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून नेमणूक देवुन त्यांच्याकडून कार्यालयीन कामकाज करुन घेणे अपेक्षीत आहे. यातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणार आहे. या विद्यार्थ्यांचे विद्यावेतन राज्यशासन देणार आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठासाठी २९ विद्यार्थ्यांना प्रशिक्षणार्थी म्हणून नेमणूक करण्यास शासनाने मान्यता दिली. गेल्या आठवड्यात या विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या. १२ वी पास/आयटीआय/पदवीधर/पदव्युत्तर किंवा पदविका धारक अशी शैक्षणिक पात्रता होती. बांधकाम, ग्रंथालय, वित्त, विद्युत आदी विभागामध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणार्थी म्हणून रुजू करुन घेण्यात आले. निवड झालेल्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा परिचय कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांच्याशी करुन देण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ.विनोद पाटील, वित्त व लेखा अधिकारी सीए. रवींद्र पाटील, संचालक डॉ.राजेश जवळेकर उपस्थित होते.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ४ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी एम.टेक. प्रथमवर्ष अभियांत्रिकी/तांत्रिकीच्या काही जागा रिक्त आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांना दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत संस्थेत अर्ज करण्याची मुदत देण्यात आलेली आहे. असे संस्थेचे संचालक प्रा.ए.के. गोस्वामी यांनी कळविलेले आहे. सदर रिक्त जागांची परिपूर्ण माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना/पालकांना आवाहन करण्यात येते की अधिक माहितीसाठी या संस्थेतील डॉ.पवन डी. मेश्राम, समन्वयक (मोबाईल क्र. ८०८७२७६९२२) किंवा डॉ.आर.एस. सिरसाम समन्वयक (मोबाईल क्र. ८८०६६७१३६९) यांचेशी संपर्क साधावा.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३१ (प्रतिनिधी ) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना एकाच वेळी दुहेरी पदवीची संधी प्राप्त होणार असून शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी झालेल्या विद्यापीठाच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत या संदर्भातील मार्गदर्शक तत्वांना मंजुरी देण्यात आली असून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाशी या संदर्भात लवकरच सामंजस्य करार केला जाणार आहे.

कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापरिषेदेची बैठक झाली. प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे यावेळी उपस्थित होते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार एकावेळी अनेक कौशल्य संपादन करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यापुर्वी एकाच वेळी दोन अभ्यासक्रम करण्याची परवानगी विद्यार्थ्यांना नव्हती आता विद्यार्थ्याला एकाच वेळी दोन पदविका/पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाची निवड करता येईल. मात्र एकाच वेळी दोन पदवी घेतांना त्यांच्या वर्गाच्या वेळा वेगवेगळया असाव्या लागतील. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाशी सामंजस्य करणार असून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात मुख्य पदवीसाठी प्रवेशित विद्यार्थी मुक्त विद्यापीठाच्या ओपन / डिस्टन्स लर्निंग ऑनलाईन मोडमध्ये करू शकणार आहेत. त्यासंदर्भातील अभ्यासक्रम निश्चित करण्यात आले आहेत. विज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य एस.एस. राजपूत यांनी या संदर्भातील माहिती विद्यापरिषदेच्या बैठकीत दिली. कबचौ उमवितील प्रवेशित विद्यार्थ्यांना आपली मुळ कागदपत्रे या विद्यापीठाकडे जमा करावे लागतील तर मुक्त विद्यापीठाकडे प्रवेश घेतांना कबचौ उमविचे बोनाफाईड आणि विद्यापीठाकडून साक्षांकित केलेली कागदपत्रे तसेच १०० रूपयांचे घोषणापत्र द्यावे लागेल. विद्यापरिषदेच्या बैठकीत यावर एकमताने निर्णय घेण्यात आला.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठ अनुदान आयोगाचे स्वयम नियमन -२०२१ स्वीकारण्याचा निर्णय विद्यापरिषदेने घेतला. यानुसार विद्यार्थ्यांना आपल्या एकूण क्रेडिट पैकी जास्तीत जास्त ४०% क्रेडिटस् स्वयम कोर्सेस मोफत मिळवता येतील. या कोर्सेसची परीक्षा विद्यापीठ पातळीवर सुध्दा घेता येणार आहे. पहिल्यांदा विद्यापीठ परिसरातीत प्रशाळांमधील पदवी/ पदव्युत्तरचे विद्यार्थी आणि महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे विद्यार्थी यांच्यासठी ही योजना राबवावी असे ठरले. त्यानंतर टप्प्याटप्प्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागू केली जाईल. या संदर्भातील कार्यप्रणाली विद्यापरिषदेने स्वीकारली. या बैठकीत इतर काही विषयांवर चर्चा होवून मान्यता देण्यात आली . कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी बैठकीचे सूत्रसंचालन करून शेवटी आभार मानले.

........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३१ ऑगस्ट, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३१ (प्रतिनिधी ) राष्ट्र उभारणीत शिक्षण व्यवस्था सक्षम असणे गरजेचे असून त्यासाठी शिक्षणावरील खर्च वाढविणे आवश्यक आहे. त्यासोबतच खाजगीकरण आणि व्यापारीकरणाचा पुर्नविचार करावा लागेल. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात याअनुषंगाने प्रयत्न सुरु असले तरी समाज, स्वयंसेवी संस्था यांनी देखील पुढाकार घेतला तरच समृध्द भारताचे स्वप्न साकार होईल असे प्रतिपादन राज्यशास्त्राचे अभ्यासक प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा रा.से.यो. विभाग आणि विद्या विकास मंडळाचे सी.गो. पाटील महाविद्यालय, साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी ऑनलाईन झालेल्या साने गुरूजी व्याख्यानमाले अंतर्गत ते बोलत होते. सी.गो. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे हे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. देवरे यांनी **'राष्ट्र निर्माणात शिक्षणाचे महत्व'** या विषयावर सविस्तर मांडणी केली. प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक युगातील शिक्षण व्यवस्थेचा आढावा त्यांनी घेतला. उत्तम माणूस घडत नाही तोवर उत्तम राष्ट्र निर्माण होणार नाही म्हणून उत्तम मनुष्य घडविण्याची प्रक्रिया शिक्षणातूनच घडत असते. प्रगत आणि विकसित राष्ट्रांनी शिक्षणाला महत्व दिले. भारतात १९व्या शतकाच्या प्रारंभी नव्या राष्ट्रवादाची संकल्पना मांडली गेली. त्याचा पाया राष्ट्रीय शिक्षण हाच होता. त्यासाठी समाजसुधारक आणि क्रांतीकारक यांनी मोठे योगदान दिले. त्यातूनच स्वातंत्र्य मिळाले. स्वतंत्र भारतात मोठ्या संस्था व उद्योग उभे राहिले. समाजाचा सकलविकास हा शिक्षणाच्या माध्यमातून होत असतो. राज्यकर्ते आणि शिक्षणव्यवस्था यांचा परस्पर संबंध दिसून येतो. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून समृध्द आणि विकसित राष्ट्र घडवायचे असेल तर केवळ शासनावर अवलंबून राहून चालणार नाही. तर समाज, स्वयंसेवी संस्था, नागरिक यांना पुढे यावे लागेल. काही विसंगती निर्माण होण्याचा धोका आहे. धर्मांधता, अंधश्रध्दा, प्रांतवाद वाढण्याची भिती आहे. गरीबी, बेरोजगारी, उपासमार तसेच वंचित आणि महिलांचे प्रश्न कसे सोडविता येतील याचा विचार करावा लागेल. शिक्षणावरचा खर्च वाढवावा लागेल त्यातून शिक्षण व्यवस्था बळकट झाली तरच समृध्द भारताचे स्वप्न साकार होईल असे डॉ. देवरे म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी चारित्र्यसंपन्न विद्यार्थी घडविण्याची प्रक्रिया विद्यापीठामार्फत केली जात असल्याचे सांगितले. रा.से.यो. चे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केले. प्रा. सुरेंद्रसिंग मगर यांनी आभार मानले.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३१ ऑगस्ट, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

जळगाव दि.३० (प्रतिनिधी ) सिनॅरिझीया लाईफ सायन्सेस, वाडा, मुंबई या नामांकित कंपनीसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेतील तीन विद्यार्थ्यांची निवड झाली.

सिनॅरिझीया लाईफ सायन्सेस, वाडा, मुंबईच्या कंपनीत विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षामार्फत घेण्यात आलेल्या मुलाखती मध्ये विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेतील केमिकल इंजि. च्या कुष्णा टाके, तेजस पाटील व प्रणव महाजन या तीन विद्यार्थ्यांची ज्युनिअर एक्झुक्युटीव्ह प्रोडक्शन या पदाकरीता निवड झाली आहे. रू. ४.६० लाख या वार्षिक वेतनावर या विद्यार्थ्यांची निवड झाली. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रशाळेचे संचालक प्रा.अजय गोस्वामी, केमिकल इंजिनिअरींगचे विभागप्रमुख प्रा. जे.बी. नाईक, डॉ. उज्वल पाटील, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.३० (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा रा.से.यो. विभाग आणि विद्या विकास मंडळाचे सी.गो. पाटील महाविद्यालय, साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी ऑनलाईन होणाऱ्या साने गुरूजी व्याख्यानमाले अंतर्गत प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे यांचे व्याख्यान होणार आहे.

साने गुरूजी कथामाला, मुंबई यांनी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून या व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. **'राष्ट्र निर्माणात शिक्षणाचे महत्व'** या विषयावर डॉ.पी.डी. देवरे हे ऑनलाईन संवाद साधणार असून व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. रा.से.यो. चे संचालक डॉ. सचिन नांद्रे व सी.गो. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे हे प्रमुख संयोजक आहेत. सकाळी ११ वाजता झूम आणि यू ट्यूब द्वारे या व्याख्यानाचे प्रसारण केले जाणार आहे.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३० ऑगस्ट, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२३ (प्रतिनिधी) : महाराष्ट्र शासनाचा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने **'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना'** राबविली जाणार असून यामध्ये **इच्छुक तरूणांना सहा महिन्यासाठी कार्यप्रशिक्षणाची (अॅप्रेंटिस) संधी** मिळणार असून **विद्यापीठाच्या विविध विभागात २९ पदांसाठी दि. ३१ ऑगस्ट, २०२४ रोजी थेट मुलाखती होणार आहेत.**

प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे रोजगारक्षम करून उद्योजकांना आवश्यक असणारे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हे या याजनेचे उद्दिष्टये आहेत. या योजनेत सहा महिने कार्यप्रशिक्षणाचा कालावधी राहणार असून या कालावधीतील विद्यावेतन शासनामार्फत उमेदवारांना मिळेल. नवीन शैक्षणिक धोरणात अॅप्रेंटिंसशिप वर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव त्यामुळे मिळणार आहे. सहा महिने ऑनजॉब ट्रेनिंग किंवा अॅप्रेंटिंसशिप अंतर्भुत असणारे अभ्यासक्रमाचे विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत. विद्यापीठात वित्त विभाग, कायदा विभाग, शैक्षणिक विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, क्रिडा विभाग, ज्ञानस्त्रोत केंद्र येथे आणि मल्टीटास्क ऑपरेटर येथे प्रशिक्षणार्थी म्हणून २९ जणांना संधी प्राप्त होणार आहे. उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२वी पास / आयटीआय / पदवीधर /पदव्युत्तर किंवा डिप्लोमाधारक अशी आहे. १२वी पास साठी प्रतिमाह सहा हजार, आयटीआय / पदविका साठी आठ हजार आणि पदवीधर / पदव्युत्तर साठी दहा हजार प्रतिमाह विद्यावेतन दिले जाणार आहे. www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर इच्छुकांनी नाव नोंदणी करावी विहित नमुन्यातील अर्ज विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून अर्हताधार उमेदवारांनी आवश्यक त्या दस्ताऐवजाच्या मुळ, स्वसाक्षांकित प्रतीसह संलग्न केलेला मुळ अर्जासह विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमधील व्यवस्थापन परिषद सभागृहात स्वखर्चाने शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी ११ वाजता उपस्थित रहावे असे आवाहन कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी केले आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळ शैक्षणिक अर्हता, कामांचा विभाग व इतर सूचनांचा तपशिल देण्यात आला आहे.

## बातमी क्र.२

जळगाव, दि. २३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेच्या वतीने दि. १८ व १९ सप्टेंबर रोजी GOLD-CT-2024 या द्वितीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

माजी प्र-कुलगुरु तथा रसायनशास्त्र प्रशाळेतील प्रोफेसर पी.पी.माहुलीकर हे सप्टेंबर महिन्यात सेवानिवृत्त होतअसल्यामुळे त्यांच्या सेवेचा गौरव करण्यासाठी ही आंतरराष्ट्रीय परिषद विद्यापीठात होणार आहे. या परिषदेचे उद्धाटन आयीटीचे माजी कुलगुरु प्रा.जी.डी. यादव यांच्या हस्ते होणार असुन गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश,पंजाब,दिल्ली, जम्मु-कश्मिर, आंध्रप्रदेश, तेलंगाणा, कर्नाटक,गोवा,मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमधुन संशोधक विद्यार्थी, शास्त्रज्ञ व प्राध्यापक उपस्थित राहणार आहेत. या आंतरराष्ट्रीय परिषदेत दक्षिण आफ्रिकेतील प्रा.श्रीकांता जोन्नालगड्डा, दक्षिण कोरियातील प्रा.सोहन देवोन, मॅक्सिकोतील डॉ. मारिसेला मार्टिनेझ, डॉ.प्रियंका मक्कर यांची व्यांख्याने होणार आहेत. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.आर.डी.कुलकर्णी आणि पुणे येथील आयसर संस्थेचे डॉ.ए.ए.नातू यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप होईल. या परिषदेत संशोधक विद्यार्थ्यांना मौखिक व पोस्टरच्या माध्यमातुन शोधनिबंध सादर करता येणार आहे. ३१ ऑगस्ट पर्यंत सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रशाळेचे संचालक प्रा.डी.एच.मोरे व या परिषदेचे निमंत्रक प्रा.डी.एस.दलाल यांनी केले आहे.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २३ ऑगस्ट, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

जळगाव दि.१६ (प्रतिनिधी) : भावना, विचार आणि वर्तन यावर गौतम बुध्दांनी अधिक उत्तम भाष्य केलेले असल्यामुळे बुध्द हे जगातील पहिले संज्ञात्मक मानसशास्त्रज्ञ ठरतात असे प्रतिप्रादन सुप्रसिध्द मनोविकार तज्ज्ञ तथा लेखक डॉ. आनंद नाडकर्णी यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेअंतर्गत असलेल्या गौतम बुध्द अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने डॉ. नाडकर्णी यांचे 'बुध्दासोबत क्षणोक्षणी' या विषयावर शुक्रवार दि. १६ ऑगस्ट रोजी व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी होते. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. आनंद नाडकर्णी यांनी गौतम बुध्दांच्या विचारांवर काव्यात्म भाष्य करतांना अनेक पैलु उलगडून दाखविले. महायानातील ध्यान पध्दतीचा मानसिक आरोग्यात वापर होत असल्याचे ते म्हणाले. बुध्द हे शोधाच्या प्रक्रियेला महत्व देतात आणि ती निरंतर चालनारी प्रक्रिया आहे. ते आपल्याला उत्कृष्टतेकडे नेतात ध्यान म्हणजे एकाग्रता नाही. निराशा, राग, असुरक्षितता या भावना ध्यानामुळे दुर होतात आणि आत्मविश्वास निर्माण होतो. माणूस इर्षा, आकांक्षा यामागे पळत राहतो, माझे-माझे करण्यात स्वत:ला अवकाश देत नाही. त्यास्थितीत बुध्द कामी येतात कारण गौतमबुध्द हे ऐतिहासिक, प्रयोगशिल पुरूष आहेत. आयुष्याकडे उन्मेषाने बघायला ते शिकवतात. स्वत:च्या विकासासाठी लोकसेवा करा असे ते म्हणतात. ते समतेचे उद्गाते आहेत. बुध्दांच्या मांडणीतील सामाजिक विचार डॉ. बाबासाहे आंबेडकरांनी घेतला असे सांगून डॉ. नाडकर्णी यांनी बुध्द विचार हा वैश्वीकतेचा आणि 'मी' ची मुक्ती करणारा असल्याचे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी प्रत्येकक्षेत्रातील वाढत्या स्पर्धेमुळे मानसिक आरोग्याचे मोठे प्रश्न निर्माण झाले असून मानवी मूल्य मागे पडत असल्या बद्दल खंत व्यक्त केली. शिक्षणातून पंखांना बळ मिळावे आाणि आपली मुळे कायम राखण्यासाठी प्रयत्न केले जावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक गौतम बुध्द अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. संतोष खिराडे यांनी केले. गौरव हरताळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.म.सु. पगारे यांनी आभार मानले.

**बातमी नं. २**

जळगाव दि.१६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला महाराष्ट्र शासनाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्यस्तरावरील तीन पुरस्कार जाहीर झाले असून त्यामध्ये बोदवड येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा, याच महाविद्यालयातील डॉ. अनिल बारी यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून आणि विद्यापीठाच्या समाजकार्य विभागाचा विद्यार्थी जयेश साळुंके याला सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार जाहीर करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाच्या वतीने सन २०२२-२३ चे राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला तीन पुरस्कार जाहीर झाले आहेत. बोदवड येयतील दि. बोदवड को-ऑप. एज्युकेशन सोसायटी मर्या., बोदवड संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार जाहीर झाला. याच महाविद्यालयातील डॉ. अनिल बारी यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार जाहीर झाला आहे. विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र प्रशाळेअंतर्गत असलेल्या समाजकार्य विभागाचा विद्यार्थी जयेश साळुके हा सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक ठरला आहे. राज्यशासनाच्या वतीने पुरस्कार वितरण सोहळयात हे पुरस्कार दिले जाणार आहेत. या पुरस्कार विजेत्यांचे कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील आणि रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी अभिनंदन केले.

**बातमी नं. ३**

जळगाव दि.१६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागातर्फे विद्यापीठ वर्धापन दिन व नामविस्तर दिनानिमित्त नुतन मराठा शिक्षणशास्त्र विद्यालयात काव्य वाचन घेण्यात आले.

वर्षा मोरे, डिंपल मोरे, प्रणाली भालेराव, दिपाली पाटील, प्रियंका पवार यांनी बहिणाबाईंच्या कविता सादर केल्यात. प्रियंका पवार हिने प्रास्ताविक केले. डॉ. एस.बी. पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. यावेळी प्रा. एम. पी. भदाणे, प्रा. एम.बी. मोरे, प्रा. पी.आय. परदेशी उपस्थित होते. प्रतिभा सोनार हिने सुत्रसंचालन केले. राहुल सरदार याने आभार मानले. विभाग प्रमुख डॉ. मनिषा इंदाणी यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरवासिते दरम्यान हा कार्यक्रम घेण्यात आला.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १६ ऑगस्ट, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

**महोदय,**

**विषयांकित ई-उत्तमविद्याचा १६ ऑगस्ट, २०२४ चा सुधारित अंक सोबत जोडला आहे. कृपया अवलोकन व्हावे.**
**ही विनंती.**

**डॉ. सुनील पाटील**
**जनसंपर्क अधिकारी**

जळगाव दि.१४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि हार्टफुलनेस एज्यूकेशन ट्रस्ट यांच्यात दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

हार्टफुलनेस एज्यूकेशन ट्रस्ट चे जागतिक मुख्यालय हैद्राबाद येथे असून १६० देशांमध्ये त्याचा विस्तार आहे. मानसिक ताणतणाव, व्यवस्थापनाच्या दृष्टीने एकाग्रता व स्मरणशक्ती संवर्धनाच्या हेतूने योगाभ्यास ध्यानाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. या सामंजस्य करारामुळे विद्यापीठातील विविध प्रशाळेतील विद्यार्थी, कर्मचारी यांच्यातील मानसिक व अध्यात्मिक आरोग्य कार्यशाळा नि:शुल्क घेतल्या जातील. तसेच मानसिक शांतता, ध्यानधारणा, नैतिक मूल्यशिक्षण यांचे विविध कार्यक्रमही घेतल्या जाणार आहेत.

या सामंजस्य करारावर हस्ताक्षर करण्यासाठी हार्टफुलनेस एज्यूकेशन ट्रस्ट यांच्या वतीने विभाग समन्वयक मीनाक्षी पाटील, धुळे व वरिष्ठ ध्यान प्रशिक्षक, डॉ. दिलीप नेहेते, जळगाव यांची उपस्थिती होती. यावेळी प्र- कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, योगशास्त्र विभाग प्रमुख इंजि राजेश पाटील तसेच डॉ. लीना चौधरी, प्रा. गीतांजली भंगाळे यांची उपस्थिती होती.

## बातमी नं. २

जळगाव दि.१४ (प्रतिनिधी) : भारतीय स्वातंत्र्याचा वर्धापन दिन व विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात उद्या गुरुवार दि. १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहण तसेच तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्या भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७८ वा वर्धापन दिन आहे तसेच विद्यापीठाचा ३४ वा वर्धापन दिन आहे. त्यानिमित्त कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते सकाळी ८ वाजता ध्वजारोहण होणार आहे. भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाच्या आदेशानुसार 'हर घर तिरंगा' अभियानातंर्गत ध्वजारोहणानंतर विद्यापीठ परिसरात तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे अशी माहिती कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी दिली.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १४ ऑगस्ट, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी



## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) : केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने जाहीर केलेल्या देशभरातील (नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेम वर्क ) शैक्षणिक संस्थांच्या मानांकनात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने अनुदानित राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या गटात ५१ ते १०० या क्रमाकांत स्थान प्राप्त केले आहे.

सोमवार दि. १२ ऑगस्ट रोजी केंद्रीय मंत्रालयाने देशातील १०हजार ८४५ उच्च शिक्षण संस्थांची श्रेणी जाहीर केली. याक्रमवारीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने भारतातील ५१ ते १०० सर्वोच्च सार्वजनिक अनुदानित राज्य विद्यापीठांच्या गटात स्थान प्राप्त केले आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या यशात मानाचा तुरा खोवला गेला आहे. दरवर्षी एनआयआरएफ रँकिंग जाहीर केली जात असते. यामध्ये अध्ययन, अध्यापन, संसाधने, संशोधन, परीक्षांचे निकाल, समावेशकता आदी निकषांचा विचार केला जातो. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने गेल्या दोन वर्षात अध्ययन, अध्यापन, संशोधन तसेच विविध सुविधा यामध्ये भरीव वाटचाल केली आहे. आशियातील सर्वोत्कृष्ट ३० टक्के क्रमवारीत विद्यापीठाला यापुर्वी स्थान मिळाले आहे. याशिवाय प्रतिष्ठीत इंग्रजी नियतकालिकाने महिनाभरा पुर्वी केलेल्या सर्वेक्षणात भारतातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठासाठी बहुविद्याशाखीय विद्यापीठ गटात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला ५० वे तर पश्चिम विभागीय विद्यापीठाच्या गटात ९ वे स्थान प्राप्त केले आहे. आता एनआयआरएफ च्या रँकिंगमध्ये विद्यापीठाला स्थान मिळाल्यामुळे विद्यापीठाचे वेगळेपण अधारेखित झाले आहे. विद्यार्थी संख्या, शैक्षणिक संसांधने, शोधनिबंध, पेटंट, संशोधन प्रकल्प तसेच विद्यार्थ्यांना प्राप्त होणारी प्लेसमेंट यामध्ये विद्यापीठाने आघाडी घेतली आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) : परंपरा, निसर्ग, स्त्रियांचे जगणे यावर भाष्य करीत अहिराणी भाषेत तसेच भारूड आणि गेय कवितांद्वारे बहिणाबाईंच्या कवितांशी नाते सांगत सादर होणाऱ्या कवितांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त अयोजित कविसंमेलन चांगलेच रंगले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी जयंती आणि नामविस्तार दिनाचे औचित्य साधून विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेतील बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्राच्यावतीने मंगळवार दि. १३ ऑगस्ट रोजी बहिणाबाईंच्या कवितेतील सौंदर्य आणि सादरीकरण या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आंबाजोगाई येथील अविनाश भारती, जळगाव येथील प्रा. संध्या महाजन आणि म्हसावद येथील विमल वाणी यांनी कवितांचे सादरीकरण केले. वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक तथा व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. म.सु. पगारे अध्यक्षस्थानी होते. विमल वाणी यांनी अहिराणी भाषेतील 'आमी भारतन्या नारी घेसी गगन ना भरारी' ही कविता तसेच 'आता वेगळं निघायचं राया, आपण वेगळ निघायचं राया' हे भारूड सादर करून स्त्री सुलभ भावना व्यक्त केल्या. प्रा. संध्या महाजन यांनी 'माय बहिणाई कशी तुनी करामंत , शेतकऱ्याच्या भाषेले नेलं विद्येच्या पीठात ही कविता गाऊन दाखविली. बहिणाबाईंच्या अक्षर पेरणीने मराठीचे साहित्यशिवार हिरवे झाले' अशी भावना संध्या महाजन यांनी व्यक्त केली. अविनाश भारती यांच्या कविता सादरीकरणाला प्रचंड प्रतिसादर मिळाला. 'गावकुसाचा हाका येती, जीवन झाले ओझे गं' आणि 'तुझ्या नाजुक हातात, सखे चुडाही नाजुक, माझी नजर भावुक, त्याले सगळे ठाऊक' ही गेय कविता सादर केली. बहिणाबाईंच्या कविता अनुभवातून आल्या असल्यामुळे जनसामान्यांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या आहेत. असे अविनाश भारती यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्रा.म.सु. पगारे यांनी जगण्याच्या तत्त्वज्ञानावर दोन ओळींमध्ये बहिणाबाईंचे भाष्य प्रेरणा देणारे असल्याचे सांगून जगभर बहिणाबाई यांच्या कविता सर्वांसाठी प्रेरक ठरल्या आहेत, असे मत मांडले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बहिणाबाई अध्ययन व संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. नितीन बडगुजर यांनी केले. नेत्रा उपाध्ये यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. गौरव हरताळे यांनी आभार मानले.

**बातमी नं. ३**

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातंर्गत संलग्ननित महाविद्यालय / परिसंस्था आणि शैक्षणिक प्रशाळा यामधील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेकरीता ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

बऱ्याच विद्यार्थी/विद्यार्थिंनी यांचेकडून अति पर्जन्यवृष्टी झाल्याने तसेच शुल्क भरण्यासाठी पैसे नसल्याचे कारण देवून महाविद्यालयात प्रवेश मिळणेबाबत प्राचार्यांकडे विनंती केली जात आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विद्यापीठाने संलग्ननित महाविद्यालय / परिसंस्था आणि शैक्षणिक प्रशाळा यामध्ये विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता यापुर्वी दिलेली १० ऑगस्ट पर्यंतची मुदतवाढ आता ३१ ऑगस्टपर्यंत वाढवून देण्यात आली आहे. प्रवेशापासून वंचीत असलेल्या विद्यार्थी/ विद्यार्थिनींनी महाविद्यालयामध्ये जाऊन प्रवेश घ्यावेत असे आवाहन विद्यापीठाने परिपत्रकान्वये केले आहे.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १३ ऑगस्ट, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, जळगाव यांच्यात दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

सदर सामंजस्य करारावर हस्ताक्षर करण्यासाठी शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील प्रभारी अधिष्ठाता डॉ. अभिजित अहिरे, संस्कृत संहिता सिद्धांत विभाग प्रमुख व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश कोलारकर,प्र- कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, आंतर विद्या प्रशाळेच्या संचालक डॉ. मनिषा इंदाणी, डॉ. राजेश जवळेकर, योगशास्त्र विभागप्रमुख इंजि राजेश पाटील, डॉ. लीना चौधरी, प्रा. गीतांजली भंगाळे यांची उपस्थिती होती.

योग आणि आयुर्वेद ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व विद्यापीठाचा योगशास्त्र विभाग या सामंजस्य करारांमुळे जोडले गेल्यामुळे दोन्ही प्राचीन पद्धतींचा अवलंब करून रोग निवारण चांगल्या पद्धतीने साधले जाईल. या करारामुळे पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग तसेच विविध वैद्यकीय चाचण्यांच्या सहाय्याने संशोधनाच्या विविध संधी, ज्ञानाची देवाणघेवाण, तसेच विविध खर्चिक वैद्यकीय चाचण्या व उपकरणे संशोधनासाठी सहज उपलब्ध झाल्यामुळे रोगनिवारण होऊन शारीरिक व मानसिक स्वास्थ लाभ आयुर्वेद व योग यांच्याद्वारे उत्तमप्रकारे साधले जाईल अशी अपेक्षा आहे.

बातमी नं. २

जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र प्रशाळेतील रा.से.यो. एकक आणि समाजकार्य विभागाच्या वतीने सोमवार दि. १२ ऑगस्ट रोजी नशामुक्त भारत अभियानातर्गत पथनाट्य आणि सामुहिक प्रतिज्ञा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सामाजिक न्याय विभाग भारत सरकार यांच्या वतीने देशभर नशामुक्त भारत अभियान राबविले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र प्रशाळेच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषद समाजकल्याण अधिकारी विजय रायसिंग, चेतना व्यसनमुक्ती उपचार केंद्राचे संचालक नितीन विसपुते, कलावंत विनोद ढगे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी मनोज इंगोले, डॉ. कविता पाटील यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. विनोद ढगे आणि त्यांच्या संचाने व्यसनमुक्तीवर पथनाट्य सादर केले. नशामुक्त भारताची प्रतिज्ञा यावेळी विद्यार्थ्यांनी घेतली. नितीन विसपुते यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. विजय घोरपडे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. डॉ. मनोज इंगोले यांनी आभार मानले.

.............................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १२ ऑगस्ट, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३१ (प्रतिनिधी) : खान्देशात जैवशास्त्र विषयातील पहिली पिढी घडविण्याचे काम शिक्षक या नात्याने प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी केले असून आज एकीकडे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील संवाद संपत असतांना प्रा. माहेश्वरी यांच्यासारखा शिक्षक होणे नाही अशी भावना प्रा. माहेश्वरी यांच्या गौरव समारंभात व्यक्त झाली.

कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी हे ३१ वर्षांच्या सेवेनंतर आज दि. ३१ जुलै रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवशास्त्र प्रशाळेतील प्रोफेसर पदावरून सेवानिवृत्त झाले. जैवशास्त्र प्रशाळेच्या वतीने दोन दिवसांपासून सुरु असलेल्या राष्ट्रीय परिसंवादाच्या समारोप सत्रात प्रा. माहेश्वरी यांच्या सेवेचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारताच्या कृषी शास्त्रज्ञ निवड मंडळाचे माजी अध्यक्ष तथा परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.सी.डी. मायी उपस्थित होते. यावेळी मंचावर प्रशाळेचे संचालक प्रा.ए.जी. इंगळे, संयोजन सचिव प्रा.भूषण चौधरी व प्रा. के.एस. विश्वकर्मा, शैलैजा माहेश्वरी उपस्थित होते.

यावेळी आघरकर संशोधन केंद्र पुणे येथील डॉ. प्रशांत ढाकेफळकर, डॉ. तुषार बोरसे, नॅशनल केमिकल लॅब पुणे येथे डॉ. अशोक गिरी, जळगाव येथील नवीन दंदी, उद्योजक डॉ. निलेश तेली , पुणे येथील डॉ. हेमलता मेंडकी या आजीमाजी विद्यार्थ्यांनी प्रा. माहेश्वरी यांच्याबद्दल हृदय भावना व्यक्त केल्या. प्रा. माहेश्वरी यांनी कायम विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षक या नात्याने विद्यार्थ्यांच्या सुख दु:खात ते सहभागी झालेत. उद्योजकतेचे मार्ग त्यांनी दाखविले. संशोधनात विद्यार्थ्यांना गोडी निर्माण होईल यासाठी प्रयत्न केले. विशेष म्हणजे समर्पणाच्या भावनेतून ते शिक्षक म्हणून कायम कार्यरत राहिले अशा भावना यावेळी त्यांनी व्यक्त केल्या.

डॉ. सी.डी. मायी यांनी शिक्षक हा निवृत्त होत नसतो. कुलगुरू या नात्याने प्रा. माहेश्वरी हे यापुढेही विद्यार्थ्यांना मार्ग दाखवतील असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. एस.टी. इंगळे यांनी प्रा. माहेश्वरी हे उत्तम शिक्षक आहेत. त्यांनी संशोधक विद्यार्थी घडवले आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार दिला. चर्चा आणि संवादातून ते सतत मार्ग काढत असतात असे प्रा.इंगळे म्हणाले. सत्काराला उत्तर देतांना प्रा. माहेश्वरी यांनी आपल्या ३१ वर्षातील शिक्षक म्हणून आलेले अनुभव आणि जीवन प्रवास सांगितला. शिक्षकीपेशाचा आपण आनंद घेतला. विद्यार्थ्यांमध्ये रमायला आपल्याला आवडते. संशोधन हा आपला आत्मा आहे असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी भूषण चौधरी यांनी या परिसंवादाचा अहवाल सादर केला. प्रा. प्रवीण पुराणीक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रा. के.एस. विश्वकर्मा यांनी आभार मानले.

या परिसंवादाच्या सकाळच्या सत्रात छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सतीष कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथील डॉ. मुनीष कुमार, इंदौर येथील प्रा. मिता जैन यांचे व्याख्यान झाले. त्यानंतर तुमसर येथील डॉ. के.एन. साठवणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्रात डॉ. प्रशांत ढाकेफळकर, इंदौर येथील डॉ.सुनीता कटारीया यांचे व्याख्यान झाले.

### बातमी नं. २

जळगाव दि.३१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातंर्गत संलग्ननित महाविद्यालय / परिसंस्था आणि शैक्षणिक प्रशाळा यामधील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेकरीता १० ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

विद्यापीठात बऱ्याच विद्यार्थी/विद्यार्थिंनी यांचेकडून महाविद्यालयात प्रवेश मिळणेबाबत विनंती अर्ज प्राप्त झाले होते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विद्यापीठाने संलग्ननित महाविद्यालय / परिसंस्था आणि शैक्षणिक प्रशाळा यामध्ये विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता १० ऑगस्ट पर्यंत विशेष बाब म्हणून मुदत वाढवून दिली आहे.

प्रवेशापासून वंचीत असलेल्या विद्यार्थी/ विद्यार्थिनींनी महाविद्यालयामध्ये जाऊन प्रवेश घ्यावेत असे आवाहन विद्यापीठाने परिपत्रकान्वये केले आहे.

**बातमी नं. ३**

जळगाव दि.३१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व क्किक हिल फाऊंडेशन, पुणे तसेच महाराष्ट्र सायबर सेल यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील केंद्रीय विद्यालय येथे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' याबाबत जनजागृती करण्यात आली.

विद्यापीठातील केंद्रीय विद्यालयात क्किक हिल फाऊंडेशन, पुणे व महाराष्ट्र सायबर सेल यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थिनी प्रगती कोल्हे व सायली चौधरी यांची 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या योजनेत निवड झाली आहे. या विद्यार्थिनींनी सायबर सुरक्षेबाबत धडे दिले तसेच क्वीक हिल व महाराष्ट्र सायबर सेलचे कामाची माहिती दिली. त्यांनतर इंटरनेट मार्फत लहान मुलांसोबत जे गुन्हे होतात त्यापासून कसा बचाव करता येतो याबाबतीत सविस्तर माहिती दिली. यावेळी केंद्रीय विद्यालयाचे संगणक कक्षाचे शिक्षक नितीन पाटील, तसेच प्राचार्य सोना कुमार हे उपस्थित होते. क्वीक हिल फाउंडेशचे सुंगधा दाणी व थकन जानगवळी व संगणकशास्त्र प्रशाळेचे समन्वयक प्रा. राजु आमले यांचे मार्गदर्शन लाभले.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३१ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३० (प्रतिनिधी) : देशाच्या विकासात संशोधन आणि तंत्रज्ञान हे घटक महत्वाचे असून नव्या पिढीने आपल्या क्षेत्रात हे घटक आत्मसात करून आत्मनिर्भर भारत होण्यासाठी योगदान द्यावे अशी अपेक्षा भारताच्या कृषी शास्त्रज्ञ निवड मंडळाचे माजी अध्यक्ष तथा परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.सी.डी. मायी यांनी व्यक्त केली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवशास्त्र प्रशाळेच्या वतीने दि. ३० व ३१ जुलै रोजी जैवशास्त्र या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाला प्रारंभ झाला. या परिसंवादाचे उद्घाटन करतांना डॉ. मायी बोलत होते. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंचावर प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, प्रशाळेचे संचालक प्रा.ए.जी. इंगळे, संयोजन सचिव प्रा.भूषण चौधरी व प्रा. के.एस. विश्वकर्मा उपस्थित होते. डॉ. मायी म्हणाले की, अफ्रिकन देशात जीएम टेक्नॉलॉजीच्या वापरामुळे अन्नधान्यात स्वयंपूर्णता आली असून त्यावर साधक-बाधक चर्चा सुरु आहे. बीटी कापूस, बीटी वांगे याबद्दल चर्चा करतांना डॉ. मायी यांनी कृषी क्षेत्रात मोठे बदल होत असल्याचे नमूद केले. जेनिटिक्सवर आधारीत तंत्रज्ञानामुळे भारतातील अन्नधान्य, फळेभाज्या यांच्या उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. कृषी क्षेत्र हे मुलत: जैवशास्त्र आहे. यामध्ये मोठा वाव आहे. मात्र संशोधनासाठी विद्यार्थी येत नाहीत. कृषी विद्यापीठांत अपुरा निधी आणि शिक्षकांच्या असलेल्या रिकाम्या जागा यामुळे मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. कृषी क्षेत्रात मोठ्या गुंतवणुकीची गरज आहे. विज्ञान व तंत्रज्ञान आणि संशोधन हे विद्यापीठांचे अवयव आहेत. तेव्हा तरूण पिढीने शिकत असतांना संशोधन आणि तंत्रज्ञान याबाबत अधिक माहिती आत्मसात करावी आणि देशाच्या विकासाला हातभार लावावा असे आवाहन डॉ. मायी यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी संशोधनासाठी आवड, धीर आणि चिकाटी हे गुण महत्वाचे असून संशोधनाचा वापर औद्योगिक आणि व्यावसायिक कारणांसाठी करावा असे आवाहन केले. अवलोकन, आकलन आणि विशेषण यातून नाविन्यपूर्ण संशोधन आकाराला येते. मानवी जीवनासाठी संशोधन मोलाचे असल्याचे प्रा. माहेश्वरी म्हणाले. प्रारंभी संचालक प्रा.ए.जी. इंगळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. प्रवीण पुराणिक यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.भूषण चौधरी यांनी आभार मानले.

उद्घाटनानंतर अमरावती येथील प्रा. सतीश मालोदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्रात पुणे येथील डॉ. अशोक गिरी, जळगावचे डॉ. बाल कृष्णा यादव यांचे व्याख्यान झाले. दुसरे सत्र डॉ. कानन पुराणिक यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी आय.पी.आर. चेअर प्रोफेसर प्रा. डी.जी. हुंडीवाले, मुंबईच्या पेटंट मुख्य कार्यालयातील संयुक्त नियंत्रक डॉ. दिनेश पाटील यांचे व्याख्यान झाले. तिसरे सत्र प्रा. पी.पी. माहुलीकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले यामध्ये डॉ.सी.डी. मायी, नंदुरबार येथील वैज्ञानिक डॉ. जयंत उत्तरवार यांचे व्याख्यान झाले. त्यानंतर पोस्टर्स प्रदर्शन झाले.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

उद्या बुधवार दि. ३१ जुलै रोजी सकाळचे सत्र छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सतीष कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. त्यामध्ये पुणे येथील डॉ. मुनीष कुमार, इंदौर येथील प्रा. मिता जैन यांचे व्याख्यान होणार आहे. त्यानंतर तुमसर येथील डॉ. के.एन. साठवणे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सत्रात पुणे येथील डॉ. प्रशांत ढाकेफळकर, इंदौर येथील डॉ.सुनीता कटारीया यांचे व्याख्यान होईल. दुपारी या परिसंवादाचा समारोप डॉ.सी.डी.मायी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असून प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे अध्यक्षस्थानी राहतील.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३० जुलै, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

जळगाव दि.२९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवशास्त्र प्रशाळेच्या वतीने उद्या दि. ३० व ३१ जुलै रोजी जैवशास्त्र या विषयावर राष्ट्रीय परिसंवाद होत आहे.

उदयोन्मुख संशोधक, तज्ज्ञ, शास्त्रज्ञ आणि विद्यार्थी यांच्यात परस्पर संवाद व्हावा या दृष्टीकोनातून हा परिसंवाद होणार आहे. उद्या मंगळवार दि. ३० जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा गडचिरोली येथील सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी रिसोर्स सेंटरचे अध्यक्ष डॉ. सी.डी. मायी यांच्याहस्ते या परिसंवादाचे उद्घाटन होणार असून कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील. उद्घाटनानंतर अमरावती येथील प्रा. सतीश मालोदे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सत्रात पुणे येथील डॉ. अशोक गिरी, जळगावचे डॉ. बाल कृष्णा यादव यांचे व्याख्यान होणार आहे. दुसरे सत्र डॉ. कानन पुराणिक यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून आय.पी.आर. चेअर प्रोफेसर प्रा. डी.जी. हुंडीवाले, मुंबईचे डॉ. दिनेश पाटील यांचे व्याख्यान होईल. तीसरे सत्र प्रा. पी.पी. माहुलीकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून डॉ.सी.डी. मायी, नंदुरबार येथील वैज्ञानिक डॉ. जयंत उत्तरवार यांचे व्याख्यान होणार आहे. त्यानंतर पोस्टर्स प्रदर्शन होईल.

बुधवार दि. ३१ जुलै रोजी सकाळचे सत्र छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सतीष कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. त्यामध्ये पुणे येथील डॉ. मनीष कुमार, इंदौर येथीली प्रा. मिता जैन यांचे व्याख्यान होणार आहे. त्यानंतर तुमसर येथील डॉ. के.एन. साठवणे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सत्रात पुणे येथील डॉ. प्रशांत ढाकेफळकर, इंदौर येथील डॉ.सुनीता कटारीया यांचे व्याख्यान होईल. दुपारी या परिसंवादाचा समारोप डॉ.सी.डी.मायी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असून प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे अध्यक्षस्थानी राहतील. अशी माहिती प्रशाळेचे संचालक प्रा.ए.जी. इंगळे व संयोजन सचिव प्रा.के.एस. विश्वकर्मा, प्रा. बी.एल. चौधरी यांनी दिली.

..........................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २९ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेत डिप्लोमा इन जर्नालिझम , एम.ए.एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता) या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची अंतिम मूदत ३१ जुलै २०२४ पर्यंत आहे.

डिप्लोमा इन जर्नालिझम हा बारावी नंतरचा एक वर्षीय अभ्यासक्रम असून प्रवेश घेण्यासाठी इयत्ता बारावीत किमान ४० टक्क्यांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच पदवी (एनी ग्रॅज्युएशन) नंतर एम.ए.एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता) हा दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम असून या अभ्यासक्रमाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. याशिवाय डिजिटल आणि सोशल मीडिया, कॅमेरा हॅन्डलिंग, व्हिडिओ एडिटींग, रेडिओ जॉकी, रायटींग फॉर न्यूजपेपर, न्यूजपेपर पेजिनेशन, जनसंपर्क या सात प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

प्रवेशाकरिता बारावी किमान ४० टक्यांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. हे अभ्यासक्रम तीन महिन्याच्या मुदतीचे असून या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या फक्त रविवारी दोन सत्रात तासिका होणार आहेत. त्यामुळे नोकरी, व्यवसाय, उद्योग सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहेत. प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर भेट देवून https://nmuj.digitaluniversity.ac या ऑनलाईन ॲडमिशन लिंकला क्लिक करून प्रवेशासंबंधी अर्ज करणे आवश्यक आहे. तरी इच्छूक विद्यार्थ्यांनी प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर (8407922404), डॉ.गोपी सोरडे (9834166072) अथवा प्रशाळेत कार्यालयीन वेळेत 0257-2257436, 2257438 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर यांनी केले आहे.

.....................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २७ जुलै, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील कला व मानव्यविद्या प्रशाळेअंतर्गत संगीत विभागात शै. वर्ष २०२४-२५ साठी पदविका व एम.ए. गायन, वादन (तबला) तसेच नाट्यशास्त्र या विषयासाठी प्रथम वर्षासाठी प्रवेश देणे सुरु आहेत.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळून विविध व्यावसायिक संधी या अभ्यासक्रमामुळे मिळू शकतात त्यासाठी विद्यापीठातील कला व मानव्यविद्या प्रशाळेअंतर्गत संगीत विभागात पदविका व पदव्युत्तर एम.ए. साठी गायन, वादन (तबला) व नाट्यशास्त्र विषयात प्रवेश सुरू असून या अभ्यासक्रमांसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी ३१ जुलै, २०२४ पर्यंत प्रवेश घ्यावा असे आवाहन विद्यापीठामार्फत करण्यात आले आहे. अधिक माहिती साठी डॉ. मनोज गुरव (९४२३१४६६१८) व तेजस मराठे (९२२६२५७०५२). अशी माहिती प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. राम भावसार यांनी दिली आहे.

..............................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २७ जुलै, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

जळगाव दि.२६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्यातील सामंजस्य करारानुसार क्विक हिल सायबर वॉरिअर क्लब ऑफ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापन करण्यात आला आहे.

सायबर सुरक्षेच्या जनजागृती अंतर्गत स्थापन केलेल्या या क्लब मध्ये चार सदस्यांची नेमणुक करण्यात आली असून त्या मध्ये अध्यक्ष पायस सावळे, सेक्रेटरी मयुर बंडे, अॅक्टीव्हीटी डायरेक्टर रेवती फिरके, पीआर डायरेक्टर प्रगती कोल्हे व शिक्षक समन्वयक प्रा. राजु आमले सर व ३६ स्वयंसेवकची निवड करण्यात आली आहे.

क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या सिनीयर एक्झीकेटीव्ह सुगंधा दानी यांनी या क्विक हिल सायबर वॉरिअर क्लब ऑफ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठच्या सर्व क्लब ऑफिसर्स व सदस्यांना दि १२ जुलै रोजी ऑनलाईन फाऊंडेशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांबद्दल मार्गदर्शन केले. तसेच दि. १५ जुलै रोजी शाळा महाविद्यालयातील विविध वयोगटातील विद्यार्थ्यांशी संवाद कसा साधावा व समाजातील लोकांना सायबर गुन्ह्याबाबत जागृती कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. त्याचबरोबर दि २३ जुलै रोजी जळगाव येथील पोलीस विभागातील सायबर सेलचे पीएसआय डिगंबर थोरात, हेड कॉन्स्टेबल दिलीप चिंचोले व पोलीस नाईक सचिन सोनवणे यांनी स्वयंसेवकांना समाजात कशा प्रकारे गुन्हे घडतात व त्यापासून कसे वाचावे व काय उपाय योजना कराव्या याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच फाऊंडेशनचे स्वयंसेवक जळगाव,धुळे, नंदुरबार येथे सायबर सुरक्षा या विषयावर जनजागृती करणार आहेत.

**बातमी नं. २**

जळगाव दि.२६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पाळधी येथे सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली.

दि. २४ जुलै रोजी पाळधी येथील सिध्दीविनायक गणपती मंदिरात सायंकाळी ४ ते ६ वाजेदरम्यान क्विक हिल सायबर वॉरिअर क्लब ऑफ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांनी सायबर सुरक्षेतेबाबत जनजागृती केली. त्यात ओटीपी फ्रॉड,बँक फ्रॉड, फिशींग, सायबर बुलिंग,फेक कॉल्स इ. गुन्ह्यांबद्दल नाट्य स्वरुपात सायबर सुरक्षेतेबाबत जनजागृती केली. यावेळी उपस्थित असलेल्या ४०० भावीक भक्तांनी या सायबर सुरक्षीततेबाबत माहिती घेतली. यावेळी क्विक हिल सायबर वारिअर क्लब ऑफ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे अध्यक्ष पायस सावळे, सेक्रेटरी मयुर बांडे, अॅक्टिव्हीटी डायरेक्टर श्वेता फिरके, पीआर मिडीया डायरेक्टर प्रगती कोल्हे व शिक्षक समन्वयक प्रा. राजु आमले आणि ३६ स्वयंसेवकांनी नाट्य स्वरुपात सायबर सुरक्षितता या विषयावर जनजागृतीबाबत मार्गदर्शन केले.

.....................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २६ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२४ (प्रतिनिधी) : भारतीय स्टेट बँकेच्या वतीने सीएसआर योजनेअंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहासाठी पाच सॅनिटरी नॅपकीन व्हेंडिग मशिन आणि डिस्पोजल मशिन भेट देण्यात आले. बँकेचे महाव्यवस्थापन अनिरूध्दकुमार चौधरी यांनी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांची बुधवार दि. २४ जुलै रोजी भेट घेवून संवाद साधला त्यावेळी हे मशिन भेट देण्यात आलेत.

भारतीय स्टेट बँकेचे महाव्यवस्थापक अनिरूध्दकुमार चौधरी हे जळगाव दौऱ्यावर आले असता त्यांनी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांची भेट घेतली. बँकेच्या सीएसआर उपक्रमांतर्गत मुलींच्या वसतिगृहासाठी पाच सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिग मशिन विद्यापीठाला भेट देण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, उपवित्त व लेखाधिकारी सोमनाथ गोहिल, वसतिगृह रेक्टर प्रा.मनिषा जगताप तसेच बँकेच्या जळगाव विभागीय व्यवस्थापक धर्मेंद्रकुमारसिंग, मुख्य व्यवस्थापक सागर खेडकर, व्यवस्थापक अशिष जाधव व सागर मोदी तसेच बँकेचे अधिकारी सुयोग पाटील आणि अमोल महाजन हे उपस्थित होते. यावेळी चौधरी यांनी बँकेच्या विविध योजनांविषयी कुलगुरुंसोबत चर्चा केली.

..................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २४ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२४ (प्रतिनिधी) : महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील हे उद्या गुरूवार दि. २५ जुलै रोजी सकाळी १० ते १२ या कालावधीत वेबीनारच्या माध्यमातून विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांच्याशी शासन निर्णय आणि विविध शिष्यवृत्ती योजना या विषयी संवाद साधणार आहेत तरी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांनी या संवादाचे थेट प्रक्षेपण करण्याची व्यवस्था करावी असे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

ज्या विद्यार्थिनींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थिनींना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्कात १००% सवलत देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या निर्णयाबद्दल तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाद्वारे विद्यार्थी हिताच्या राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांबाबतची माहिती देण्याकरीता राज्यातील सर्व विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांच्यासोबत चंद्रकांत दादा पाटील हे वेबीनारच्या माध्यमातून संवाद साधणार आहेत. त्याचे थेट प्रक्षेपण सर्व महाविद्यालयांमध्ये व विद्यापीठात केले जाणार आहे. तरी सर्व महाविद्यालयांनी या थेट प्रक्षेपणाची व्यवस्था या महाविद्यालयांमध्ये करावी व विद्यार्थी आणि पालक यांना या कार्यक्रमास महाविद्यालयात उपस्थित राहण्याबाबत अवगत करावे. असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी पत्राद्वारे महाविद्यालयांना केले आहे. विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहातदेखील कॅम्पसवरील विद्यार्थ्यांसाठी या संवादाचे थेट प्रक्षेपण पहाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

.............................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २४ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२३ (प्रतिनिधी) : तोकुशिमा विद्यापीठ, जपान आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य करारातंर्गत तीन विद्यार्थी जपान येथे १५ दिवसांच्या समर स्कूल प्रशिक्षणात सहभागी झाले आहेत.

विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थी मिलन सोनवणे तसेच विद्यार्थिनी लेखमाला इंगळे व केतकी चौधरी हे तिघे २२ जुलै ते ७ ऑगस्ट या कालावधीत तोकुशिमा विद्यापीठ, जपान येथे होत असलेल्या समर स्कूल मध्ये सहभागी झाले आहेत. या विद्यार्थ्यांना फेलोशिप देखील दिली जाणार आहे. कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी तसेच प्रशाळेतील सर्व प्राध्यापकांनी सहभागी झालेल्या या तीन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्यात.

### बातमी नं. २

जळगाव दि.२३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवशास्त्र प्रशाळेच्या वतीने ३० व ३१ जुलै रोजी राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

उदयोन्मुख संशोधक, तज्ज्ञ, शास्त्रज्ञ आणि विद्यार्थी यांच्यात परस्पर संवाद व्हावा या दृष्टीकोनातून हा परिसंवाद होणार आहे. यासाठी संशोधन गोषवारा २५ जुलै पर्यंत directorslskbc@gmail.com या मेलवर पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विद्यार्थी अथवा संशोधकांसाठी पोस्टर सादरीकरणाचे सत्र देखील होणार आहे. या परिसंवादासाठी उपविषय जे देण्यात आले आहे त्यामध्ये १) प्लॅन्ट बायोकेमेस्ट्री ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी २) मायक्रोबियल बायोटेक्नॉलॉजी ॲण्ड फर्मेंटेंशन टेक्नॉलॉजी ३) मोल्युक्युला बायोलॉजी ॲण्ड बायोकेमिकल इंजिनिअरींग ४) बायोमेडिसीन ॲण्ड नॅचरल प्रोडक्टस ५) एन्झीमि टेक्नॉलॉजी ॲण्ड फॉर्मास्युटिकल बायोटेक्नॉलॉजी आदी विषयांचा समावेश आहे. अशी माहिती प्रशाळेचे संचालक प्रा.ए.जी. इंगळे व संयोजन सचिव प्रा.के.एस. विश्वकर्मा, प्रा. बी.एल. चौधरी यांनी दिली.

..............................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २३ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी



जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील योगशास्त्र विभागाद्वारे दिनांक २१ जुलै २०२४ रोजी गुरुपोर्णिमेच्या औचित्याने सकाळी ०८:०० ते १०:०० या वेळेत **अंतरंग योग साधना** आयोजित करण्यात आली होती. अंतरंग योग साधनेमुळे विद्यार्थ्यांची ग्रहणक्षमता, एकाग्रता, स्मरणशक्ती वाढीस लागते. या साधनेचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना किंवा साधकाला आपली आध्यात्मिक प्रगती अथवा मानसिक स्वास्थ्य साधणे सहज शक्य होत असते.

कार्यक्रमाच्या प्रसंगी एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाचे सर्व विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते. या साधनेमध्ये श्वसनाच्या अभ्यासासहित प्राणायाम व ध्यानाचा अभ्यास प्राध्यापक डॉ. लीना चौधरी यांनी घेतला. यावेळी प्रा. गीतांजली भंगाळे व योगशास्त्र विभागाचे प्रमुख इंजि.राजेश पाटील उपस्थित होते.

.......................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २२ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

जळगाव दि.१९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वसतिगृहासाठी सुचविण्यात आलेली ३०% शुल्कवाढ कमी करून १५% करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. दरम्यान शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या एका वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या बृहत आराखड्यातील शिफारशींना देखील व्यवस्थापन परिषद आणि त्यानंतर झालेल्या अधिसभेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दि. १९ जुलै रोजी सकाळी व्यवस्थापन परिषदेची आणि त्यानंतर अधिसभेची बैठक झाली. सन २०२५-२६ या एका वर्षाचा विद्यापीठाचा बृहत आराखडा मान्य करून शासनाकडे सादर करण्याकरीता या बैठका घेण्यात आल्या. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत या बृहत आराखड्यावर चर्चा झाली. नवीन महाविद्यालयांसाठी स्थान निश्चित केलेले ५८ स्थळबिंदुसह अधिष्ठाता मंडळाने तयार केलेल्या या बृहत आराखड्यात ज्या शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. त्याला व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

विद्यापीठ कॅम्पसवरील विद्यार्थी / विद्यार्थिनींच्या वसतिगृह शुल्कात याशैक्षणिक वर्षापासून ३०% दरवाढ करण्यात आली. वसतिगृह व्यवस्थापन समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने ही दरवाढ करण्यात आली होती. काही विद्यार्थी संघटनांनी ही शुल्कवाढ मागे घेण्याबाबत विद्यापीठ प्रशासनाकडे मागणी केली होती. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये या मागणीवर चर्चा झाली आणि ३० % ऐवजी १५% शुल्कवाढीला व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. या बैठकीला प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, राजेंद्र नन्नवरे, प्रा. अनिल डोंगरे, प्रा.साहेबराव भुकन, प्रा.म.सु. पगारे, प्राचार्य संजय सुराणा, प्रा.शिवाजी पाटील, प्रा. सुरेखा पालवे, नंदकुमार बेंडाळे, नितीन झाल्टे, प्रा. महेंद्र रघुवंशी, डॉ. पवित्रा पाटील, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, सीए रवींद्र पाटील, प्रा.योगेश पाटील उपस्थित होते.

**बृहत आराखड्याला अधिसभेची मान्यता**

व्यवस्थापन परिषदेने बृहत आराखड्याला मान्यता दिल्यानंतर अंतीम मंजूरीसाठी अधिसभे समोर आराखडा मांडण्यात आला. कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली अधिसभेची बैठक झाली. व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशींसह या आराखड्याला अधिसभेने मान्यता दिली. यावेळी झालेल्या चर्चेत प्रा.एकनाथ नेहते, प्रा. धिरज वैष्णव, निशांत रंधे, डॉ. मंदा गावीत, नितीन ठाकूर आदींनी भाग घेतला.

**बातमी नं. २**

जळगाव दि.१९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाद्वारे प्रमाणपत्र, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झालेली आहे. मागील वर्षापासून यशस्वीरीत्या सुरु असलेल्या एम.ए. योगशास्त्र या अभ्यासक्रमासह सर्टिफिकेट कोर्स इन मसाज थेरेपि हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम व डिप्लोमा इन योग टीचर हा पदविका अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यात आला असून या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झालेली आहे.

डिप्लोमा इन योग टीचर हा १२ वी नंतरचा एक वर्षीय अभ्यासक्रम असून प्रवेश घेण्यासाठी इयत्ता १२ वी किमान ४०% सह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच सर्टिफिकेट कोर्स इन मसाज थेरेपि हा १० वी नंतरचा तीन महिने मुदतीचा अभ्यासक्रम आहे. या सोबतच पदवी (कोणत्याही

शाखेचा पदवीधर) ही किमान पात्रता असलेला एम.ए. योगशास्त्र हा दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहे. हे सर्व अभ्यासक्रम शनिवार, रविवार रोजी होणार आहेत. त्यामुळे नोकर, व्यवसाय, उद्योग सांभाळून हे अभ्यासक्रम पुर्ण करता येणार आहेत. या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना समाजामध्ये अधिकृत योग शिक्षक, सहायक प्राध्यापक बनण्याची तर सर्टिफिकेटकोर्स इन मसाज थेरेपि हा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर अधिकृत मसाज थेरेपिस्ट बनण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सर्व अभ्यासक्रमांची संरचना आणि अंमलबजावणी प्रक्रिया नवीन शैक्षणिक धोरण-२०२० नुसार राहणार आहे. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरित विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर वेळेत भेट देऊन अधिक माहिती घेऊ शकतात. तसेच इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासंबंधी योगशास्त्र विभागात कार्यालयीन वेळेत 0257-2257180, 2257181, 2257182 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन योगशास्त्र विभागप्रमुख इंजि. राजेश पाटील यांनी केले आहे.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १९ जुलै, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने दिला जाणारा राज्य पातळीवरील प्रतिष्ठेचा 'कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार' यावर्षी महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेला दिला जाणार असून त्यासाठी ९ ऑगस्ट २०२४ पर्यंत विद्यापीठाने प्रस्ताव मागविले आहे.

गेल्या दोन वर्षांपासून विद्यापीठाच्या वतीने राज्यपातळीवर कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार दिला जातो. रूपये ५१ हजार, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सामाजिक, कृषी, शिक्षण आणि साहित्य हे चार क्षेत्र पुरस्कारासाठी निश्चित करण्यात आले आहेत. पैकी यावर्षीचा राज्यस्तरीय पुरस्कार शिक्षण क्षेत्रासाठी दिला जाणार आहे. शिक्षण क्षेत्रात समर्पित भावनेने काम करणारी व्यक्ती अथवा संस्था ज्यांनी मूल्याधिष्ठीत शिक्षणसाठी प्रयत्न केले आहेत.तसेच नाविन्यपूर्ण शिक्षणप्रणाली विकसित केली आहे त्यांनी या पुरस्कारासाठी अर्ज करावेत. दि. ९ ऑगस्ट २०२४ पर्यंत कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कारासाठी अर्ज असे लिफाफ्यावर नमूद करून 'कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, पत्रपेटी क्र. ८०, जळगाव, जिल्हा जळगाव – ४२५ ००१ या पत्त्यावर प्रस्ताव पाठवावेत. पुरस्कारासाठी व्यक्ती किंवा संस्था महाराष्ट्राच्या कोणत्याही भागातील असावी. व्यक्ती असेल तर त्या व्यक्तीचे वय ४० वर्षांपेक्षा कमी नसावे आणि १५ वर्षापेक्षा जास्त काळ त्या क्षेत्रात काम केलेले असावे. संस्था असेल तर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. त्या संस्थेचे कार्य देखील १५ वर्षापेक्षा अधिक असावे. राज्यपातळीवरील या पुरस्कारासाठीची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर देण्यात आली त्यामध्ये विहीत नमुन्यातील अर्ज, पात्रता, नियमावली देण्यात आली आहे. तज्ज्ञ निवड समिती कडून प्राप्त प्रस्तावांची छाननी होऊन पुरस्कार जाहीर केले जातील. विशेष परिस्थितीत पुरस्कारासाठी प्राप्त प्रस्तावा व्यतिरिक्त इतर योग्य व्यक्ती अथवा संस्थेचा देखील विचार केला जाऊ शकतो. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थांनी या पुरस्कारासाठी मुदतीच्या आत प्रस्ताव पाठवावेत असे आवाहन कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी केले आहे.

..................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १५ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत युवा कौशल्य दिनानिमित्त विशारद द स्किल डेव्हलपमेंट केंद्रार्तगत कार्यक्रम घेण्यात आला.

प्रमुख अतिथी प्रा.मुक्ता महाजन यांनी कला व कौशल्य यांचे जीवनातील महत्व विशद करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रशाळा संचालक व कौशल्य विभाग समन्वयक प्रा.मधुलिका सोनवणे यांनी कौशल्य वाढीसाठी विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या कार्यक्रमांची व अभ्यासक्रमाची माहिती दिली. यावेळी डॉ. आर.आर.चव्हाण व व्य.प.सदस्य डॉ.पवित्रा पाटील यांनी देखील मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ऋग्वेद देशमुख यांनी केले. दामिनी पाटील या कार्यक्रमाच्या समन्वयक होत्या.

.............................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १६ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने दिला जाणारा राज्य पातळीवरील प्रतिष्ठेचा 'कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार' यावर्षी महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेला दिला जाणार असून त्यासाठी ९ ऑगस्ट २०२४ पर्यंत विद्यापीठाने प्रस्ताव मागविले आहे.

गेल्या दोन वर्षांपासून विद्यापीठाच्या वतीने राज्यपातळीवर कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार दिला जातो. रूपये ५१ हजार, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सामाजिक, कृषी, शिक्षण आणि साहित्य हे चार क्षेत्र पुरस्कारासाठी निश्चित करण्यात आले आहेत. पैकी यावर्षीचा राज्यस्तरीय पुरस्कार शिक्षण क्षेत्रासाठी दिला जाणार आहे. शिक्षण क्षेत्रात समर्पित भावनेने काम करणारी व्यक्ती अथवा संस्था ज्यांनी मूल्याधिष्ठीत शिक्षणसाठी प्रयत्न केले आहेत.तसेच नाविन्यपूर्ण शिक्षणप्रणाली विकसित केली आहे त्यांनी या पुरस्कारासाठी अर्ज करावेत. दि. ९ ऑगस्ट २०२४ पर्यंत कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कारासाठी अर्ज असे लिफाफ्यावर नमूद करून 'कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, पत्रपेटी क्र. ८०, जळगाव, जिल्हा जळगाव – ४२५ ००१ या पत्त्यावर प्रस्ताव पाठवावेत. पुरस्कारासाठी व्यक्ती किंवा संस्था महाराष्ट्राच्या कोणत्याही भागातील असावी. व्यक्ती असेल तर त्या व्यक्तीचे वय ४० वर्षापेक्षा कमी नसावे आणि १५ वर्षापेक्षा जास्त काळ त्या क्षेत्रात काम केलेले असावे. संस्था असेल तर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. त्या संस्थेचे कार्य देखील १५ वर्षापेक्षा अधिक असावे. राज्यपातळीवरील या पुरस्कारासाठीची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर देण्यात आली त्यामध्ये विहीत नमुन्यातील अर्ज, पात्रता, नियमावली देण्यात आली आहे. तज्ज्ञ निवड समिती कडून प्राप्त प्रस्तावांची छाननी होऊन पुरस्कार जाहीर केले जातील. विशेष परिस्थितीत पुरस्कारासाठी प्राप्त प्रस्तावा व्यतिरिक्त इतर योग्य व्यक्ती अथवा संस्थेचा देखील विचार केला जाऊ शकतो. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थांनी या पुरस्कारासाठी मुदतीच्या आत प्रस्ताव पाठवावेत असे आवाहन कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी केले आहे.

.......................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १५ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१५ (प्रतिनिधी) : विद्यापीठातील नियोजित बहिणाबाई चौधरी पुतळ्या शेजारी संग्रहालय उभारण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जाईल अशी ग्वाही जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी दिली.

महाराष्ट्र शासन व जळगाव जिल्हा नियोजन विकास समिती यांच्या निधीतून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात उभारण्यात आलेल्या सौर उर्जा प्रकल्पाचे उद्धाटन तसेच बहिणाबाई चौधरी यांच्या पुतळा उभारणीचे भूमिपूजन पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते सोमवार दि. १५ जुलै रोजी झाले यावेळी ते बोलत होते. कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी होते.

गुलाबराव पाटील आपल्या भाषणात म्हणाले की, हे विद्यापीठ या भागातील वैभव आणि शान असल्यामुळे विद्यापीठाच्या विकासासाठी पालकमंत्री या नात्याने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जाईल. माझ्या मतदार संघात विद्यापीठ येते याशिवाय बहिणाबाईंचे जन्म गाव आसोदादेखील येते. शैक्षणिक संस्था आणि पर्यटन स्थळ यांचा मतदार संघात समावेश आहे ही आनंदाची बाब आहे. विद्यापीठात होणाऱ्या बहिणाबाईंच्या पुतळयामुळे भावी पिढीला बहिणाबाईंचे स्मरण होत राहील. सौर ऊर्जा ही काळाची गरज आहे. विद्यापीठातील सौर ऊर्जा प्रकल्पामुळे पैशांची बचत होईल जिल्ह्यातील शासकीय इमारतींवर सौर ऊर्जेचे प्रकल्प उभे रहावे यासाठी १८ कोटींचा निधी दिला. याशिवाय जळगाव येथील सिव्हील रूग्णालयात उत्तम सुविधा देण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला. ससून हॉस्पीटल नंतर आता जळगावचा नंबर रूग्णांना सुविधा देण्यात लागेल असा विश्वास पालकमंत्र्यांनी व्यक्त केला व भविष्यातही विद्यापीठाच्या पाठीशी उभे राहण्याची ग्वाही दिली.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी विद्यापीठात बहिणाबाईंचा उभा राहणार पुतळा सगळयांनाच प्रेरणा देत राहील. बहिणाबाईंनी जगण्याचे तत्त्वज्ञान आपल्या कवितांमधून मांडले. बहिणाबाई चौधरी यांचे नाव या विद्यापीठाला देणे ही मोठी ऐतिहासिक घटना आहे असे ते म्हणाले. सौर ऊर्जा प्रकल्पामुळे वीज बिलात ३०% बचत होणार असून पर्यावरणाच्या दृष्टीने सौर ऊर्जा एक महत्वपूर्ण उपाय आहे. यामुळे कार्बन फुटप्रिंट कमी होईल. अशी अपेक्षा कुलगुरूंनी व्यक्त केली. जळगाव जिल्हा नियोजन समिती व महाराष्ट्र शासन यांनी या दोन्ही प्रकल्पांसाठी सहकार्य केल्याबद्दल कुलगुरूंनी आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. सुनील पाटील यांनी केले. कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी आभार मानले.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्रा. अनिल डोंगरे, प्रा.एस.टी. भुकन, प्रा.म.सु. पगारे, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. सुरेखा पालवे, डॉ. पवित्रा पाटील, सीए रवींद्र पाटील तसेच विद्यापीठाच्या प्राधिकरणांचे सदस्य उपस्थित होते.

.........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १५ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) : महाराष्ट्र शासन व जळगाव जिल्हा नियोजन विकास समिती यांच्या निधीतून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात उभारण्यात आलेल्या सौर उर्जा प्रकल्पाचे उद्घाटन तसेच बहिणाबाई चौधरी यांच्या पुतळा उभारणीचे भूमिपूजन सोमवार दि. १५ जुलै, २०२४ रोजी विद्यापीठात होणार आहे.

सोमवारी सायंकाळी ४.३० वाजता जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते उद्घाटन व पुतळा उभारणीचे भूमिपुजन होणार आहे. यावेळी ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्री ना. गिरीश महाजन, तसेच मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना. अनिल पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची यावेळी उपस्थिती असणार आहे. सौर उर्जा प्रकल्पासाठी व बहिणाबाई चौधरी यांच्या नियोजित पुतळयासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या प्रयत्नातून जळगाव जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी देण्यात आलेला आहे.दोन वर्षांपुर्वी विद्यापीठात या सौर उर्जा प्रकल्प उभारणीला सुरुवात झाली होती. यासाठी ३ कोटी ६६ लाख रूपये निधी मंजूर झाला. ६५० किलोवॅट क्षमतेच्या या प्रकल्पामुळे प्रति माह ३०% विजबिलात बचत होणार आहे.

बहिणाबाई चौधरी यांच्या पुतळयासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून १ कोटी ५३ लाख ७० हजार निधी मंजूर झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून पुतळा उभारण्याचे काम केले जात आहे. फेबुवारी २०२५ अखेर हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारती समोरील दर्शनिक परंतु मध्यवर्ती भागात अर्धकृती पुतळा उभारण्यात येणार आहे. अशी माहिती कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी दिली.

..................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १३ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने दिला जाणारा राज्य पातळीवरील प्रतिष्ठेचा 'कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार' यावर्षी महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेला दिला जाणार असून त्यासाठी ९ ऑगस्ट २०२४ पर्यंत विद्यापीठाने प्रस्ताव मागविले आहे.

गेल्या दोन वर्षांपासून विद्यापीठाच्या वतीने राज्यपातळीवर कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार दिला जातो. रूपये ५१ हजार, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सामाजिक, कृषी, शिक्षण आणि साहित्य हे चार क्षेत्र पुरस्कारासाठी निश्चित करण्यात आले आहेत. पैकी यावर्षीचा राज्यस्तरीय पुरस्कार शिक्षण क्षेत्रासाठी दिला जाणार आहे. शिक्षण क्षेत्रात समर्पित भावनेने काम करणारी व्यक्ती अथवा संस्था ज्यांनी  मूल्याधिष्ठीत शिक्षणसाठी प्रयत्न केले आहेत.तसेच नाविन्यपूर्ण शिक्षणप्रणाली विकसित केली आहे त्यांनी या पुरस्कारासाठी अर्ज करावेत. दि. ९ ऑगस्ट २०२४ पर्यंत कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कारासाठी अर्ज असे लिफाफ्यावर नमूद करून 'कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, पत्रपेटी क्र. ८०, जळगाव, जिल्हा जळगाव – ४२५ ००१ या पत्त्यावर प्रस्ताव पाठवावेत. पुरस्कारासाठी व्यक्ती किंवा संस्था महाराष्ट्राच्या कोणत्याही भागातील असावी. व्यक्ती असेल तर त्या व्यक्तीचे वय ४० वर्षापेक्षा कमी नसावे आणि १५ वर्षापेक्षा जास्त काळ त्या क्षेत्रात काम केलेले असावे. संस्था असेल तर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. त्या संस्थेचे कार्य देखील १५ वर्षापेक्षा अधिक असावे. राज्यपातळीवरील या पुरस्कारासाठीची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर देण्यात आली त्यामध्ये विहीत नमुन्यातील अर्ज, पात्रता, नियमावली देण्यात आली आहे. तज्ज्ञ निवड समिती कडून प्राप्त प्रस्तावांची छानननी होऊन पुरस्कार जाहीर केले जातील. विशेष परिस्थितीत पुरस्कारासाठी प्राप्त प्रस्तावा व्यतिरिक्त इतर योग्य व्यक्ती अथवा संस्थेचा देखील विचार केला जाऊ शकतो. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थांनी या पुरस्कारासाठी मुदतीच्या आत प्रस्ताव पाठवावेत असे आवाहन कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी केले आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे ऑनलाईन पोर्टलचे उद्घाटन कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, ॲड अमोल पाटील, नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील हे उपस्थित होते. यावेळी बोलतांना कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी ऑनलाईन काम ही काळाची गरज गरज असून कमी कालावधीत विद्यार्थी  विकासाच्या योजना पोहचविण्यासाठी या प्रणालीचा उपयोग होईल असा विश्वास व्यक्त केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एज्युटेक फाउंडेशनच्या वतीने हे पोर्टल तयार करण्यात आले आहे. या विद्यापीठाचे  प्रा. नितीन पाटील, दीपक हर्डीकर यावेळी उपस्थित होते.

उद्घाटनानंतर विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांची कार्यशाळा घेण्यात आली. तीनही जिल्ह्यातील १७९ अधिकारी व प्राचार्य उपस्थिती होते. विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी प्रास्ताविक करून आभार मानले. राजेश बघे, मच्छिंद्र पाटील, जगदीश शिवदे , अनुराग महाजन, चंदन मोरे व कृष्णा लांडगे यांनी या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १२ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांचेकडून प्रा. म.सु. पगारे यांचे नामनिर्देशन करण्यात आले आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील कलम ३०(४) (e) नुसार विद्यापीठाचे विभाग प्रमुखांमधून प्रा. पगारे यांची एक वर्ष कालावधीसाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशन केल्याचे पत्र आज रोजी निर्गमित केले आहे. प्रा. पगारे हे विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील मराठी विभागाचे विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ प्रशाळा व संलग्नित महाविद्यालयातील एम.एस्सी. (सर्व विषय) आणि एम.एस्सी. / एम.ए. (भूगोल) प्रथम वर्ष या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विविध विषयांसाठी केंद्रीय पध्दतीने ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली असून सदर विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पुर्तता करण्याची मुदत १६ जुलै, २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. मुदतवाढीमुळे दि. ११ जुलै रोजी प्रसिध्द होणारी अंतिम गुणवत्ता यादी आता १७ जुलै, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

दि. १२ जुन पासून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली होती यादरम्यान ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज केले होते. मात्र विविध तांत्रिक अडचणींमुळे काही विद्यार्थी कागदपत्रांची पुर्तता करू शकले नाही. त्या संदर्भात विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे मुदतवाढीची विनंती केली होती. विद्यार्थीहित लक्षात घेऊन तक्रार निवारणाची तारीख व एआरसी सेंटर येथे कागदपत्र पडताळणी करण्याची मुदत दि.१६ जुलै, २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. दि. १७ जुलै, २०२४ रोजी अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येणार असून प्रवेश प्रक्रियेचे सुधारीत वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. अशी माहिती प्रवेश व पात्रता विभागाचे सहायक कुलसचिव राजेश ठाकरे यांनी दिली.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ११ जुलै, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि संलग्नीत समाजकार्य महाविद्यालयांमधून शै. वर्ष २०२४-२५ करीता एम.एस.डब्ल्यु. प्रथम वर्षाची केंद्रीय पध्दतीने ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरु झाली असून प्रवेश प्रकियेसाठी १६ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. २१ जुलै रोजी सामायिक प्रवेश परीक्षा होणार आहे.

एम.एस.डब्ल्यू. चे सात ठिकाणी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यामध्ये १) लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव २) भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा ३) श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटीचे पंडीत जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर ४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ५) महात्मा फुले एम.एस.डब्ल्यु. व मातोश्री झ.मो. तुर्खिया बी.एस.डब्ल्यु. महाविद्यालय, तळोदा ६) स्कूल ऑफ सोशल सायन्सेस, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव ७) विद्यापीठ संचलित आदिवासी अकादमी, नंदुरबार याठिकाणी विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. काही विद्यार्थ्यांचे पदवी परीक्षांचे रिड्रेसलचे निकाल जाहीर होत असल्याने विद्यार्थीहित लक्षात घेवून प्रवेशासाठी ९ जुलै ऐवजी १६ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) भेट देवून १६ जुलै पर्यंत ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहेत. १८ जुलैच्या दुपारपर्यंत स्वीकृतीकेंद्रावर ऑनलाईन अर्जाची प्रिंट काढून जमा करावी. याच दिवशी पात्र विद्यार्थ्यांची तात्पुरती यादी विद्यापीठाचे संकेतस्थळ तसेच संबंधित महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर जाहीर होईल. १९ जुलै पर्यंत विद्यार्थ्यांना आक्षेप नोंदवता येतील. २० जुलै रोजी पात्र उमेदवारांची अंतीम यादी जाहीर होईल त्याच दिवशी सामायिक प्रवेशासाठी ऑनलाईन हॉलतिकीट विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध होतील. २१ जुलै रोजी स. ११ ते १२ या वेळेत सामायिक प्रवेश परीक्षा होणार आहे. २५ जुलै रोजी या प्रवेश परीक्षेचा निकाल व अंतीम गुणवत्ता यादी जाहीर होईल. त्यानंतर कॅप राऊंड होणार असून त्या संदर्भात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहिती देण्यात आली. अशी माहिती एम.एस.डब्ल्यू. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेचे कार्याध्यक्ष प्रा. किशोर पवार यांनी दिली.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ९ जुलै, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन व अध्ययन व विस्तार विभागाद्वारे प्रमाणपत्र, पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस १० जुलै, २०२४ पासुन सुरु होत आहे.

तळागाळातील व्यक्ती शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच ज्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही, अथवा नोकरी करीत असल्यामुळे, घराची जबाबदारी अंगावर पडल्यामुळे पदवीधर होता आले नाही, अशा विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार व व्यवसाय करणाऱ्या महिला, शासकीय/निमशासकीय कर्मचारी, सामाजिक क्षेत्रात काम करणारी व्यक्ती अशा सर्वांसाठी बाहेरून शिक्षण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाने उचललेले एक अभिनव पाऊल आहे. सर्व शिक्षणक्रमांची संरचना आणि अंमलबजावणी प्रक्रिया नवीन शैक्षणिक धोरण -२०२० नुसार सत्र पध्दतीने आहे. आजीवन विभाग हा विद्यापीठातीलल वेगळेपण जोपासणारा विभाग आहे. या विभागाद्वारे आपले पदव्युत्तर शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून विद्यापीठाचे नावलौकिक जोपासले आहे.

या विभागातर्फे मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, संरक्षण व सामरिक शास्त्र, समुपदेशन मानसशास्त्र हे विषय घेऊन एम.ए. करता येईल आणि एम.ए. (शिक्षणशास्त्र), एम.कॉम. हे अभ्यासक्रम करता येणार आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सेमिस्टर पध्दती असल्याने वर्षातून दोन वेळा परीक्षांचे आयोजन , प्रवेश ते पदवी प्रदान अंतर्गत ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने अंमलबजावणी प्रक्रिया , प्रवेशीत विद्यार्थ्यांना विषयानुसार स्वयंअध्ययन साहित्य ई-स्वरूपात उपलब्ध, विविध स्पर्धा परीक्षा, पीएच.डी., नोकरीसाठी पदवीस मान्यता आणि समान संधी. रविवारी तसेच सुट्टीच्या दिवशी संमंत्रण सत्रांचे ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने (Councelling Session in Hybrid Mode) आयोजन केले जाईल. अधिक माहितीसाठी कार्यालयाचे फोन नंबर ०२५७-२२५७४९५/२२५८४९६ या क्रमांकावर संपर्क साधावा. अथवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) संपूर्ण माहिती पाहता येईल, अशी माहिती संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी दिली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ८ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.७ (प्रतिनिधी) : राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्याचा सर्वांगीण व्यक्तीमत्त्व विकास होतो, नेतृत्व घडण्यासाठी मदत होते आणि सामाजिक भान निर्माण होते असे प्रतिपादन खा.स्मिताताई वाघ यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सृष्टी संवर्धन शिबिराच्या समारोपात केले.

विद्यापीठाच्या रा.से.यो.च्या विभागाच्या वतीने दि. १ते ७ जुलै या कालावधीत विद्यापीठस्तरीय कुलगुरू उन्हाळी शिबीर (सृष्टी संवर्धन – २०२४) पार पडले या शिबीराचा समारोप रविवारी खा. स्मिताताई वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्र- कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे व अॅड अमोल पाटील, अधिसभा सदस्य अमोल मराठे व स्वप्नाली महाजन-काळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. खा. स्मिताताई वाघ म्हणाल्या की, महाविद्यालयीन जीवनात मी रा.से.यो. माध्यमातून काम केले आहे. जळगावातील हरी विठ्ठल नगरात रा.से.यो. तर्फे हुंडाबळी बाबत सर्व्हेक्षण करण्यात आले होते त्यामध्ये माझा सहभाग होता. अशा शिबिरांचा व्यक्तीमत्त्व विकासासाठी आणि नेतृत्व घडण्यासाठी उपयोग होत असतो. या शिबीरातून जे शिकायला मिळाले त्याचा उपयोग समाजासाठी करावा वैयक्तिक पातळीवर चार झाडे लावून त्याची निगा राखा. दुसऱ्याला सांगण्यापेक्षा आपल्यापासून सुरुवात केली तर त्या शिबिराचे यश राही असे त्या म्हणाल्या. या विद्यापीठाशी स्थापनेपासून कार्यकर्ता, त्यानंतर अधिसभा सदस्य म्हणून नाते राहिलेले आहे. त्यामुळे भविष्यात दिल्लीत विद्यापीठासंदर्भात ज्या अडचणी असतील त्या मार्गी लावण्याचा प्रयत्न खासदार या नात्याने निश्चितच केला जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी ज्ञान आणि क्षमता यांचा अहंकार न बाळगता अभिमान बाळगा असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. आपल्या भाषणात कुलगुरूंनी टी-२० वर्ल्डकप मध्ये भारतीय संघाने विश्वविजेते पद प्राप्त करतांना जी सांघिक भावना संघाने जोपासली त्याचे उदाहरणे देत स्पष्टीकरण दिले. अपयश आले तर उणिवांवर काम करा आणि ध्येय गाठा. यश मिळाल्यानंतर पुढील उद्दीष्टे निर्धारित करा असे आवाहन केले.

प्रमुख पाहुणे राजेंद्र नन्नवरे यांनी शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांनी सृष्टी संवर्धनासाठी काम करावे असे आवाहन केले. वैयक्तिक पातळीवर आपल्याला जे जे शक्य आहे ते करावे असे ते म्हणाले. खा. स्मिताताई वाघ यांचे विद्यापीठाशी जवळचे नाते आहे. त्यामुळे त्यांनी दिल्लीत विद्यापीठाच्या राजदूत म्हणून काम करावे अशी अपेक्षा श्री. नन्नवरे यांनी बोलून दाखविली. रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी प्रास्ताविकात आठवडाभराच्या शिबिराचा आढावा घेतला. यावेळी कृष्णा हाटे, हेमंत खेडकर, घन:श्याम पाटील, निलम कुंवर व यामिनी गुरव या विद्यार्थ्यांनी तसेच संघ व्यवस्थापकांतर्फे प्रा. मनिष करंजे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिनेश पाटील यांनी केले. कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी आभार मानले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ७ जुलै, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि.(प्रतिनिधी)- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेत डिप्लोमा इन जर्नालिझम, एम.ए.एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता) या अभ्यासक्रमांसह डिजिटल आणि सोशल मीडिया, कॅमेरा हॅन्डलिंग, व्हिडिओ एडिटींग, रेडिओ जॉकी, रायटींग फॉर न्यूजपेपर, न्यूजपेपर पेजिनेशन,जनसंपर्क हे तीन महिन्याचे सात प्रमाणपत्र अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यात आले असून या कौशल्यआधारित व रोजगारभिमुख अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

डिप्लोमा इन जर्नालिझम हा बारावी नंतरचा एक वर्षीय अभ्यासक्रम असून प्रवेश घेण्यासाठी इयत्ता बारावीत किमान 40 टक्क्यांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच पदवी (कोणत्याही शाखेचा पदवीधर) नंतर एम.ए.एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता) हा दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम असून या अभ्यासक्रमाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. याशिवाय डिजिटल आणि सोशल मीडिया, कॅमेरा हॅन्डलिंग, व्हिडिओ एडिटींग, रेडिओ जॉकी, रायटींग फॉर न्यूजपेपर, न्यूजपेपर पेजिनेशन, जनसंपर्क या सात प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेशाकरिता बारावी किमान 40 टक्क्यांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. हे अभ्यासक्रम तीन महिन्याच्या मुदतीचे असून या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे दर रविवारी दोन सत्रात तासिका होणार आहेत. त्यामुळे नोकरी, व्यवसाय, उद्योग सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहेत.

वरील अभ्यासक्रम पूर्णत: रोजगारभिमुख असून यशस्वी विद्यार्थ्यांना वृत्तपत्रे, रेडिओ, वृत्तवाहिन्या, ऑनलाईन पत्रकारिता, सोशल मिडिया, जाहिरात संस्था आदी ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध आहे. त्याचबरोबर शासकीय किंवा खाजगी क्षेत्रात जनसंपर्क अधिकारी, संवाद तज्ज्ञ, सोशल मिडिया हँडलर म्हणून कार्य करण्याची देखील संधी उपलब्ध आहे. एमए.एमसीजे व डिप्लोमा इन जर्नालिझम या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर भेट देवून https://nmuj.digitaluniversity.ac या ऑनलाईन अॅडमिशन लिंकला क्लिक करून प्रवेशासंबंधी अर्ज करणे आवश्यक आहे. तरी इच्छूक विद्यार्थ्यांनी प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर (8407922404), डॉ.गोपी सोरडे (9834166072) अथवा प्रशाळेत कार्यालयीन वेळेत 0257-2257436, 2257438 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर यांनी केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव, दि.(प्रतिनिधी)- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेत सहा विषयांच्या पदव्युत्तर प्रवेशासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली असून रोजगाराभिमूख असे हे अभ्यासक्रम गेल्या काही वर्षापासून सुरु आहेत.

१९९२ मध्ये रसायनशास्त्र प्रशाळेला सुरुवात झाली. पॉलीमर केमिस्ट्री, पेस्टीसाईड अॅण्ड अग्रो केमिकल्स, इंडस्ट्रीयल केमिस्ट्री, ऑरगॅनिक केमिस्ट्री, फिजीकल केमिस्ट्री आणि अॅनालिटीकल केमिस्ट्री असे एकूण सहा एम.एस्सी. अभ्यासक्रम सुरु आहेत. या प्रशाळेत २००९ पासून सीबीसीएस पॅटर्न लागू आहे. गत वर्षापासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम आणि सीजीपीए प्रणाली स्विकारली आहे. या अभ्यासक्रमांसाठी औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञ, विषयातील तज्ज्ञ आणि माजी विद्यार्थी यांचा अभिप्राय घेण्यात येतो. विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा यासाठी विद्यापीठाच्या सीटीपीसी मार्फत परिसर मुलाखतींचे आयोजन केले जाते. या प्रशाळेतील विद्यार्थ्यांना नामांकित उद्योग संस्था, शैक्षणिक संस्था यामध्ये रोजगार संशोधनाची संधी मिळते. बरेच विद्यार्थी स्वत:चे व्यवसाय सुरु करतात. नियमित तासिका, प्रात्यक्षिके, संशोधन प्रकल्प, औद्योगिक भेटी, इंडस्ट्रीयल ट्रेनिंग आणि ऑनजॉब ट्रेनिंग याचे काटेकोर पालन केले जाते. तरी बी.एस्सी. उत्तीण विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट देवून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया करावी असे आवाहन प्रशाळेचे संचालक प्रा. डी.एच. मोरे यांनी केले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ५ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या वतीने सुरु असलेल्या सृष्टी संवर्धन शिबिरात दररोज श्रमदान, पर्यावरण स्वच्छता याचे धडे गिरवत खान्देशातील तरूणाई विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरात रमली आहे.

दि. १ ते ७ जुलै या कालवधीत विद्यापीठ स्तरीय रा.से.यो. शिबिर आयोजित करण्यात आले आहे. तीन जिल्ह्यातील संलग्नीत महाविद्यालयातील १६८ रा.से.यो. स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. यामध्ये ७४ विद्यार्थिनींचा समावेश आहे. रोज सकाळी योगा, श्रमदान दुपारी व्याख्यान त्यानंतर संध्याकाळी गटचर्चा व सांस्कृतिक कार्यक्रम असा भरगच्च कार्यक्रम आहे. 'माय भारत डिजीटल लिटरसी' ही शिबिराची संकल्पना आहे. विद्यापीठाचा परिसर प्लास्टीक मुक्त करण्यासाठी ही तरूणाई रोज सकाळी विद्यापीठ परिसरात फिरून प्लास्टीक गोळा करणे, तण निर्मुलन त्यासोबतच बंधारे बांधणे आदी काम तन्मयतेने करतांना दिसत आहेत.

रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे, रा.से.यो. चे जिल्हा समनव्यक डॉ. दिनेश पाटील, डॉ. शिला राजपूत, डॉ. राजू पाटील, डॉ. विश्वास भामरे, डॉ. विशाल देशमुख यांच्या नेतृत्वाखालील हे शिबिर होत आहे. गेल्या तीन दिवसात निशिकांत काळे, डॉ. अनिल भोकरे, सीए रवींद्र पाटील, प्रा. व्ही.एन. रोकडे, विशाल सोनकुले, डॉ. सचिन नांद्रे यांनी अनुक्रमे ग्रीन एनर्जी, सेंद्रीय शेती, पैशांची बचत, ग्लोबल वॉर्मिंग, प्लास्टीक मुक्ती आणि रा.से.यो. मध्ये युवकांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. या विविध सत्रात अध्यक्ष म्हणून डॉ. विजय आहेर, अधिसभा सदस्य दिनेश चव्हाण, डॉ. महेंद्र महाजन, व्य.प.सदस्य डॉ. पवित्रा पाटील, अधिसभा सदसय अमोल मराटे, नेहा जोशी, यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ५ जुलै, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी



## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेअंतर्गत नव्याने सुरू झालेल्या बी.कॉम. (बीएफएसआय) या चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने विद्यापीठ आणि बीएफएसआय सेक्टर स्किल कौन्सिल ऑफ इंडीया यांच्यातील सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. या करारामुळे विद्यार्थ्यांना शिकाऊ प्रशिक्षणाच्या काळात स्टायपंड हाती पडण्याची खात्री मिळणार आहे.

विद्यापीठाने बँका, वित्तीय संस्था तसेच विमा क्षेत्रात आवश्यक असणारी कौशल्यप्राप्त मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन या वर्षापासून विद्यापीठात बी.कॉम. (बीएफएसआय) हा चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा अप्रेंटिसशिप एम्बेडेड पदवी कार्यक्रम असून शिक्षणाला व्यावहारिक कामाच्या अनुभवासह एकत्रित करणार आहेत. ज्यामध्ये विद्यार्थ्यांची कौशल्ये व रोजगार क्षमता वाढणार आहे. विद्यार्थ्यांना बँका,वित्तीय संस्था तसेच विमाक्षेत्र यामध्ये बीएफएसआय सेक्टर स्किल कौन्सिल ऑफ इंडीया यांच्या सहकार्याने अप्रेंटिसशिप प्राप्त होईल. त्यासाठी दिनांक ३ जुलै रोजी विद्यापीठ आणि सेक्टर स्किल कौन्सिल ऑफ इंडीया यांच्यात सामंजस्य करार झाला. बीएफएसआय क्षेत्रात रोजगारासाठी आवश्यक ज्ञान,कौशल्ये आणि मानवी संसाधने निर्माण करण्याच्या उद्देशाने अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. यासाठी सेक्टर स्किल कौन्सिल ऑफ इंडीया यांच्याकडून मार्गदर्शन प्राप्त होईल. विद्यार्थ्यांना शिकाऊ म्हणून उद्योगात सहभागी होण्यासाठी सहाय्य केले जाईल, शिकाऊ उमेदवारांच्या मागणीचे एकत्रीकरण निश्चित करण्यासाठी उद्योग आणि विद्यापीठ यांच्यात परस्पर सहाकार्याने प्रशिक्षणार्थी सोर्सिंगची शाश्वत प्रणाली या करारामुळे तयार केली जाईल. प्रशिक्षणार्थी कालावधी दरम्यान किमान निर्धारित मासिक स्टायपंड मिळण्याची खात्री असेल. अप्रेटींसशिप दरम्यान विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे सतत मुल्यमापन केले जाईल. विद्यार्थ्यांला प्रमाणपत्र दिले जाईल. विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना कौशल्य अभ्यासक्रमासाठी ऑफलाईन / ऑनलाईन शिक्षण सामग्री उपलब्ध करुन दिली जाणार आहे. ही सामंजस्य कराराची वैशिष्ट्ये आहेत. करारावर स्वाक्षरी करतांना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे,कुलसचिव डॉ.विनोद पाटील बीएफएसआय सेक्टर स्किल कौन्सिल ऑफ इंडीयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्य रंजन, नबरा चक्रवर्ती, तसेच प्रशाळेच्या संचालक प्रा.मधुलिका सोनवणे, प्रा.पवित्रा पाटील, प्रा.आर.आर.चव्हाण, प्रा.अतुल बारेकर, हर्षल नेरकर, अश्विनी मुंदडा आदी उपस्थित होते.

## बातमी क्रमांक २

जळगाव दि.४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सायबर जागरुकता दिनानिमित्त शपथ घेण्यात आली व सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्वीक हेल फाऊंडेशन,पुणे यांच्यात सामंजस्य करार झाला असून त्याअंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. विद्यापीठात सुरू असलेल्या रासेयो शिबीरात सायबर जागरुकता दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. संगणकशास्त्र प्रशाळेत अन्य सत्रात संचालक प्रा.एस.आर.कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांची रिडल स्पर्धा, डिजीटल पोस्टर्स हे उपक्रम घेण्यात आले. शपथ घेतांना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे,कुलसचिव डॉ.विनोद पाटील, रासेयो संचालक प्रा.सचिन नांद्रे, प्रा.राजू आमले, पायस सावळे, मयुर बांडे, रेवती फिरके, प्रगती कोल्हे,दर्शन नेवे आदी उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ — दिनांक: ४ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या वतीने सुरु असलेल्या सृष्टी संवर्धन शिबिरात बुधवार दि. ३ जुलै रोजी वृक्ष दिंडी काढण्यात येवून वृक्षारोपण करण्यात आले.

विद्यापीठात ७ जुलै पर्यंत हे उन्हाळी शिबिर सुरु आहे. बुधवारी सकाळी विद्यार्थी भवनापासून रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी उत्साहात दिंडी काढली. यावेळी विद्यार्थ्यांनी भजन तसेच वृक्ष संवर्धन गीत सादर केले. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी आणि शैलेजा माहेश्वरी हे वृक्षदिंडीत अग्रभागी होते. कुलगुरू प्रा.माहेश्वरी यांचा बुधवारी वाढदिवस असल्याने ६१ झाडे लावण्यात आली. यामध्ये सीताफळ, रामफळ आदी वृक्षांचा समावेश आहे. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे , कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे, अधिसभा सदस्य स्वप्नाली काळे, ऋषिकेश चित्तम, प्रा. राजु आमले, रा.से.यो. चे जिल्हा समनव्यक डॉ. दिनेश पाटील, प्रा. मनीष करंजे, प्रा. शिंगने, उद्यान अधिक्षक अश्विनी पाटील आदी उपस्थित होते.

दरम्यान या शिबिरात मंगळवारी प्रा. प्रवीण पुराणिक यांनी संशोधनाच्या वाटा या विषयावर मार्गदर्शन केले. विकास तळेले अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी करीअरच्या वाटा यावर संवाद साधला. प्रा. विश्वास भामरे अध्यक्षस्थानी होते. बुधवारी दुपारच्या सत्रात अमरावती येथील निशिकांत काळे यांनी ग्रीन एनर्जी या विषयावर तर डॉ. अनील भोकरे यांनी सेंद्रीय शेती यावर मार्गदर्शन केले. या दोन्ही सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्ञानस्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. विजय आहेर व अधिसभा सदस्य दिनेश चव्हाण होते.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.३ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात बुधवार दि. ३ जुलै रोजी प्री पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

पीएच.डी. प्रवेश पुर्व परीक्षा (पेट) २०२३ मध्ये घेण्यात आली. या परीक्षेतील विद्यार्थ्यांची प्री.पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा बुधवारी झाली. या परीक्षेसाठी ७६८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा केंद्रात चार बॅचेसमध्ये ही परीक्षा झाली. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी , प्र- कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी परीक्षा केंद्राला भेट दिली. केंद्रप्रमुख प्रा. पी.पी. माहुलीकर यांनी काम पाहिले.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.३ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या वतीने घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीद्वारे रसायनशास्त्र प्रशाळेच्या एम.एस्सी. पेस्टीसाईडस ॲण्ड ॲग्रो केमिकल्स अभ्यासक्रमाच्या चार विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यासाठी निवड झाली.

सिन्जेंटा बायोसायन्स प्रा. लि. या कंपनीसाठी राहुल माळी व शुभांगी देसले या विद्यार्थ्यांची तर गुरगाव येथील इन्स्टिट्यूट ऑफ पेस्टीसाइड फॉर्म्युलेशन टेक्नॉलॉजी या कंपनीसाठी गौरी पाटील आणि टीएम इनपुटस ॲण्ड सर्व्हिसेस प्रा. लि., पुणे या कंपनीसाठी ललित पाटील अशा एकूण चार विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. रू. ३.६० ते ५ लाख या वार्षिक वेतनावर या विद्यार्थ्यांची ऑनलाईन मुलाखतीद्वारे निवड झाली. कक्षाचे उपसमन्वयक डॉ. उज्ज्वल पाटील, समन्वयक प्रा. रमेश सरदार, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा, डॉ. अमरदिप पाटील, पेस्टीसाइड विभाग प्रमुख प्रा. रत्नमाला बेंद्रे यांनी मुलाखतींचे व्यवस्थापन केले. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रशाळेचे संचालक प्रा.धनंजय मोरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

जळगाव दि.१ (प्रतिनिधी ) सध्या वन विभागाचा वन महोत्सव सुरु असून विद्यार्थ्यांनी अधिकाधिक झाडे लावावीत व त्यांचे संवर्धन करावे. तसेच एकल प्लॅस्टीकचा वापर टाळण्याची मानसिकता तयार करावी असे आवाहन जळगाव जिल्ह्याचे उप वन संरक्षक ए. प्रवीण यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात रासेयोच्या कुलगुरु उन्हाळी शिबीराचे (सृष्टी संवर्धन २०२४) उद्घाटन करतांना केले.

विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या वतीने दि. १ ते ७ जुलै दरम्यान हे शिबीर होत असून यामध्ये १५० रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. सोमवारी झालेल्या उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी होते. तर प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, ॲड. अमोल पाटील, नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील, अधिसभा सदस्य डॉ. संदीप नेरकर, अमोल मराठे, स्वप्नाली काळे व रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे मंचावर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

उद्घाटन सत्रात पुढे बोलतांना ए. प्रवीण यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी जळगाव जिल्ह्यातील वनांना भेट द्यावी. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सजग रहावे. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत त्यांनी सांगितले की, प्रशासकीय सेवेत यशस्वी व्हायचं असेल तर प्रथम स्वत:वर विश्वास ठेवा, नियमित वर्तमानपत्रे वाचन करावे, सखोल अभ्यास करुन प्रचंड मेहनत व वेळेचा सदुपयोग करणे आवश्यक आहे.

व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांनी सांगितले की, ग्लोबल वॉर्मिंगचे परिणाम आपण पाहत आहोत त्याकरीता सृष्टी संवर्धन करणे गरजेचे असून तरुणांचा सहभाग महत्वाचा आहे. तसेच जळगाव जिल्ह्याच्या सभोवताली असलेल्या वन संपदेचा, वन्य जीव, पक्षी निरीक्षण यांचा अभ्यास करुन ग्रीन करीअर मध्ये असलेल्या संधी मिळवाव्यात.

अध्यक्षीय समारोप करतांना कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी सांगितले की, ग्लोबल वॉर्मिंगचे दुष्परीणाम आपल्या घरापर्यंत पोहचले आहे. त्यामुळे आपण स्वयं प्रेरणेने पर्यावरण संवर्धानाच्यादृष्टीने प्रयत्न करावेत. एकल वापरासाठीच्या प्लॅस्टीकचा वापर टाळला पाहिजे. रासेयोचे हे शिबीर विद्यार्थ्यांना चांगली संधी आहे. विद्यार्थ्यांनी आभासी मित्र न बनवता प्रत्यक्ष मित्र बनवावे, आजच्या युगात नियमित पदवी अभ्यासक्रमासोबतच कौशल्य, अनौपचारीक व मूल्य शिक्षण आत्मसात केले पाहिजे. संवदेनशील नागरीक बनावे, समस्यांवरील उपायांसाठी स्वयं प्रेरीत रहावे, वेळेचे महत्व व भान लक्षात ठेवावे असे आवाहन केले.

रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी प्रास्ताविकात या शिबीराचा उद्देश सांगून रासेयो विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आभार कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन रासेयो जिल्हा समन्वयक प्रा.दिनेश पाटील यांनी केले. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी डॉ. मनोज इंगोले, डॉ. मनीष करंजे, डॉ.पी.बी.पाटील (राजूसर), कक्ष अधिकारी शरद पाटील, रासेयो विभागातील शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवक प्रयत्न करीत आहेत.

दुपारच्या सत्रात व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांनी भारतीय सैम्य संपदा या विषयावर व्याख्यान दिले. यासत्राचे अध्यक्ष जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील हे होते. तसेच त्या नंरतच्या सत्रात मानवविज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. जगदीश पाटील यांनी शाश्वत जीवन शैली या विषयावर व्याख्यान दिले. यावेळी अध्यक्षस्थानी अधिसभा सदस्य भानुदास येवलेकर हे होते.

उद्या मंगळवार, दि. २ जुलै रोजी पुणे येथील रासेयो प्रादेशिक संचालक अजय शिंदे हे माय भारत पोर्टल डिजीटल लिटरसी या विषयावर व्याख्यान देतील यावेळी विकास तळेले हे अध्यक्षस्थानी असतील. त्यानंतच्या सत्रात विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.जयेंद्र लेकुरवाळे हे करीअरच्या वाटा या विषयावर व्याख्यान देतील. यावेळी अध्यक्षस्थानी अधिसभा सदस्य प्रा.सुनील निकम हे असतील.

**बातमी नं. २**

जळगाव दि.१ (प्रतिनिधी )कवयित्री बहिणबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेतर्फे सुरू होणाऱ्या बी.कॉम. (ऑनर्स) (बीएफएसआय) या अभ्यासक्रमासंबधी विस्तृत माहिती दि. ३ जुलै २०२४ रोजी विद्यार्थी पालक यांना प्रशाळेत दिली जाणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यापीठाच्या व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांर्तगत बी.कॉम. (ऑनर्स) (बीएफएसआय) या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश सुरू झाले आहेत. हा अभ्यासक्रमाविषयी सखोल माहिती देण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या सेक्टर स्कील्स कौन्सिलचे अधिकारी उपस्थित

राहणार आहेत. यावेळी विद्यार्थी व पालक यांना व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत बुधवार दि.३ जुलै रोजी दुपारी २ वाजता उपस्थित राहण्याबाबत आवाहन संचालक प्रा.मधुलिका सोनवणे यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

**बातमी नं. ३**

जळगाव दि.१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सेवेतून श्री. सुनील चव्हाण दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले त्यांना कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत निरोप देण्यात आला.

विद्यापीठाच्या बांधकाम विभागातील सहायक श्री. सुनील चव्हाण विद्यापीठाच्या सेवेतून निवृत्त झाले. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देवून त्यांचा सपत्नीक गौरव करण्यात आला. यावेळी प्र.कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील, अधिसभा सदस्य सुरेखा पाटील हे उपस्थित होते. यावेळी विद्यापीठ कर्मचारी संघटना, मागसवर्गीय कर्मचारी संघटना आणि पतपेढी यांच्या वतीने देखील सेवानिवृत्त कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कक्ष अधिकारी प्रवीण चंदनकर यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

## <u>नवीन पदवी अभ्यासक्रमांची माहिती</u>

## आज विद्यापीठात विद्यार्थी – पालकांसाठी कार्यशाळा

जळगाव दि. २७ (प्रतिनिधी) : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रशाळांमध्ये सुरु झालेल्या पदवी अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती व्हावी याशिवाय पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती व्हावी यासाठी विद्यापीठात उद्या शुक्रवार दि. २८ जून रोजी १२ वी आणि पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तसेच त्यांचे पालक यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाच्या वतीने सकाळी १० वाजता सिनेट सभागृहात होणाऱ्या या कार्यशाळेत कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्यासह या नवीन अभ्यासक्रमाची माहिती देणारे तज्ज्ञ प्राध्यापक संवाद साधणार आहेत. यावेळी व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे, डॉ. पवित्रा पाटील, अधिष्ठाता प्रा. जगदीश पाटील यांची उपस्थिती असणार आहे.

या नवीन शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठात नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत बी.कॉम. (बीएफएसआय), भौतिकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (□लेक्ट्रॉनिक्स) हे दोन नाविन्यपूर्ण चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. सेंटर फॉर रिसर्च □न स्कीम्स ॲण्ड पॉलिसी व महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सुरु होणाऱ्या या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना शिकाऊ प्रशिक्षणाची (ॲप्रेंटिसशिप) संधी मिळणार आहे. याशिवाय विद्यापीठाने गतवर्षी नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत संगणकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (कॉम्प्यूटर सायन्स), गणित शास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (मॅथेमेटीकल सायन्स) आणि सामाजिक शास्त्र प्रशाळेत बी.ए. (सोशल सायन्स) हे चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु केले आहेत. या पाच अभ्यासक्रमांची तसेच विद्यापीठाच्या विविध प्रशाळांमध्ये असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती आणि ओळख या कार्यशाळेत करून दिली जाणार आहेत. याशिवाय विद्यापीठातील सोयी – सुविधा, प्रयोगशाळा, पायाभूत सुविधा याबद्दल देखील विद्यार्थी आणि पालकांना माहिती दिली जाईल. कार्यशाळेत □लेक्ट्रॉनिक्स सेक्टर स्किल्स कौन्सील ऑफ □ंडियाच्या पश्चिम विभागाचे संचालक मंगेश मिथे, प्रा. रमेश सरदार, प्रा. जयदीप साळी, प्रा. एस.आर. कोल्हे हे देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. प्रवेशासाठी □च्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे असे आवाहन अंतर्गत गुणवत्ता निर्धार कक्षाचे संचालक प्रा. समीर नारखेडे यांनी केले आहे.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २७ जून, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय द□निकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

**नवीन पदवी अभ्यासक्रमांची माहिती**

## मंगळवारी नंदुरबार येथे विद्यार्थी – पालकांसाठी विद्यापीठातर्फे कार्यशाळा

जळगाव दि. २७ (प्रतिनिधी) : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रशाळांमध्ये सुरु झालेल्या पदवी अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती व्हावी याशिवाय विद्यापीठ प्रशाळांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती व्हावी यासाठी नंदुरबार जिल्ह्यातील १२ वी आणि पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तसेच त्यांचे पालक यांच्यासाठी मंगळवार दि. २ जुलैरोजी नंदुरबार येथील विद्यापीठाच्या एकलव्य प्रशिक्षण केंद्रात कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाच्या वतीने दुपारी २ वाजता एकलव्य प्रशिक्षण केंद्र, नंदुरबार येथे होणाऱ्या या कार्यशाळेत कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्यासह या नवीन अभ्यासक्रमाची माहिती देणारे तज्ज्ञ प्राध्यापक संवाद साधणार आहेत. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य महेंद्र रघुवंशी, विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. एस.एस. राजपूत यांची उपस्थिती असणार आहे. या संवादामुळे विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमांची माहिती तसेच करिअरच्या संधी याविषयी माहिती मिळेल आणि शंकाचे निरसन देखील होणार आहे.

या नवीन शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठात नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत बी.कॉम. (बीएफएसआय), भौतिकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) हे दोन नाविन्यपूर्ण चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. सेंटर फॉर रिसर्च ऑन स्कीम्स ॲण्ड पॉलिसी व महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सुरु होणाऱ्या या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना शिकाऊ प्रशिक्षणाची (ॲप्रेंटिसशिप) संधी मिळणार आहे. याशिवाय विद्यापीठाने गतवर्षी नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत संगणकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (कॉम्प्यूटर सायन्स), गणित शास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (मॅथेमेटीकल सायन्स) आणि सामाजिक शास्त्र प्रशाळेत बी.ए. (सोशल सायन्स) हे चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु केले आहेत. या पाच अभ्यासक्रमांची तसेच विद्यापीठाच्या विविध प्रशाळांमध्ये असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती आणि ओळख या कार्यशाळेत करून दिली जाणार आहेत. याशिवाय विद्यापीठातील सोयी – सुविधा, प्रयोगशाळा, पायाभूत सुविधा याबद्दल देखील विद्यार्थी आणि पालकांना माहिती दिली जाईल. कार्यशाळेत प्रा. जयदीप साळी, प्रा. रमेश सरदार हे विद्यार्थ्यांशी संवाद साधतील.

या पाच पदवी अभ्यासक्रमांसाठी १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी पदवी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतील. या सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून www.nmu.ac.in या संकेतस्थळावर माहिती देण्यात आलेली आहे. यंदा प्रथमच विद्यापीठाने विद्यार्थी आणि पालकांमध्ये अधिक जनजागृती व्हावी यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. तरी प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे असे आवाहन अंतर्गत गुणवत्ता निर्धार कक्षाचे संचालक प्रा. समीर नारखेडे यांनी केले आहे.

.....................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २७ जून, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

जळगाव दि. २६ (प्रतिनिधी) : सन १९९३ पासून ज्या विद्यार्थ्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून पदवी प्रमाणपत्र नेलेले नाही अशा विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून ज्या विद्यार्थ्यांनी तातडीने पदवीप्रमाणपत्र विभागातून पदवी प्रमाणपत्र घेवून जावे असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

विद्यापीठाकडून दरवर्षी दीक्षांत समारंभ आयोजित करून विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र वितरीत केले जाते. आजपर्यंत ३२ दीक्षांत समारंभ झाले आहेत. प्रत्येक दीक्षांत समारंभानंतर विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रांपैकी काही प्रमाणपत्रे विद्यापीठाकडे आहेत. यात मुख्यत: टपालातून परत आलेले, विद्यार्थ्यांनी गुणपत्रकाच्या छायांकित प्रती न जोडलेले, पात्रते अभावी राखीव असलेले, उशिरा प्रिंटींग करून आलेले, त्याच प्रमाणे ज्या विद्यार्थ्यांनी अर्जा स्वत: प्रमाणपत्र घेवून जाणार असल्याचे नमूद केले होते अशा बहुतांश विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र विद्यापीठाकडे अद्याप अवितरीत स्वरूपात पडलेली आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे ई-मेल आहेत त्यांना ई-मेल द्वारे सुचित करण्यात आले आहे. याशिवाय अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी www.nmu.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी पदवी प्रमाणपत्र घेवून न गेलेल्या विद्यार्थ्यांनी अंतीम वर्षाच्या गुणपत्रकाची सत्यप्रत आणि ओळखदर्शक पुरावा दाखवून विद्यापीठाच्या पदवीप्रमाणपत्र विभागातून पदवीप्रमाणपत्र घेवून जावे तसेच 0257-2257319 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २६ (प्रतिनिधी) : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत समाजकार्य महाविद्यालये, विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे प्रशाळेतील समाजकार्य विभाग आणि नंदूरबार येथील कबचौउमवि संचलित आदिवासी अकादमी येथे नव्याने सुरु होणाऱ्या एम.एस.डब्ल्यु. प्रथम वर्ष अभ्यासक्रमाची केंद्रीय पध्दतीने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दि. २४ जून, २०२४ पासून सुरु करण्यात आली आहे.

सदर प्रवेश प्रक्रियेबाबत प्रवेश माहिती पुस्तीका, ऑनलाईन माहिती व नोंदणी अर्ज इ. विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. **विद्यार्थ्यांनी नोंदणी शुल्क रु. ६००/- ऑनलाईन पेमेंट गेटवे द्वारे भरण्याची सुविधा नोंदणी अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.** भरलेला प्रवेश अर्ज व प्रवेश पात्रते संदर्भातील सर्व कागदपत्रे स्कॅन करुन प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्रांवर (ARC) अपलोड (Upload) करावयाची आहे. विद्यार्थांना ऑनलाईन नोंदणी अर्ज दि. २४ जून, २०२४ पासून उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. नोंदणी अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. ०९ जुलै, २०२४ पर्यंत आहे. प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज व आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे जवळच्या प्रवेश अर्ज स्विकृती केंद्राला (ARC) जाऊन अर्ज व कागदपत्रांचे व्हेरीफीकेशन करावयाचे आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेसाठी अर्ज केले आहे अशा विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा (CET) दि. १४ जुलै, २०२४ रोजी १) जळगाव जिल्ह्यासाठी- स्कूल ऑफ सोशल सायन्सेस, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, २) धुळे जिल्ह्यासाठी- एस.एस.व्ही. पी.एस. संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे ३) नंदुरबार जिल्ह्यासाठी- जी.टी.पी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार या परीक्षा केंद्रांवर १ तास १०० गुणांची बहूपर्यायी (MCQ) पध्दतीने प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या ऑनलाईन दोन फेऱ्या ( I & II Round) होतील. प्रवेश नोंदणी प्रक्रिया पुर्ण झाल्यावर, सामान्य यादी जाहीर होईल. त्यानंतर गुणवत्ता यादीवर काही आक्षेप असल्यास ते नोंदवता येतील. त्यानंतर अंतीम यादी जाहिर केली जाईल. प्रवेशासाठी पहिली व दुसरी फेरीचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी जाहीर करण्यात येईल. ऑनलाईन अलॉटमेंटसाठी ऑप्शन फॉर्म भरतांना विद्यार्थ्यांनी कमीत कमी एक ऑप्शन भरणे आवश्यक आहे. तसेच जेवढी महाविद्यालये आहेत, तितके Preference विद्यार्थी देवू शकतो. CAP Round द्वारे Online Allotment करण्यात येणार आहे. पहिल्या फेरीनंतर विद्याथ्र्यांच्या इच्छेप्रमाणे महाविद्यालय न मिळाल्यास Freeze आणि Float असे दोन पर्याय देण्यात आलेले आहेत.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज व आवश्यक कागदपत्रे स्कॅन करुन पुढील पैकी जवळच्या प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्रांवर व्हेरीफीकेशन करावे. स्वी**कृती केंद्रांची नावे** :- १) स्कूल ऑफ सोशल सायन्सेस, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव २) लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव ३) भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा ४) श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटीचे पंडीत जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर ५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य

महाविद्यालय, मोराणे ६) महात्मा फुले एम.एस.डब्ल्यु. व मातोश्री झ.मो. तुर्खिया बी.एस.डब्ल्यु. महाविद्यालय, तळोदा असे एकूण सहा केंद्र प्रवेश अर्ज स्विकृतीसाठी निश्चित करण्यात आलेले आहे.

तरी वरील अभ्यासक्रमास प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचा प्रवेश निश्चित करण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) भेट देवून सविस्तर माहिती समजून घ्यावी. सदर प्रवेश प्रक्रियेत काही अडचण आल्यास डॉ. दाऊदी हुसैन, पध्दती विश्लेषक यांच्याशी दूरध्वनी क्र. 0257- 2257158 वर किंवा ई-मेल cap@nmu.ac यावर संपर्क साधावा, अशी माहिती प्रवेश प्रक्रियेचे कार्याध्यक्ष प्रा. किशोर एफ. पवार यांनी दिली.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २६ जून, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २४ (प्रतिनिधी) : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रशाळांमध्ये सुरु झालेल्या पदवी अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती व्हावी याशिवाय पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती व्हावी यासाठी विद्यापीठात शुक्रवार दि. २८ जून रोजी १२ वी आणि पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तसेच त्यांचे पालक यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाच्या वतीने सकाळी १० वाजता सिनेट सभागृहात होणाऱ्या या कार्यशाळेत कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्यासह या नवीन अभ्यासक्रमाची माहिती देणारे तज्ज्ञ प्राध्यापक संवाद साधणार आहेत. या संवादामुळे विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमांची माहिती तसेच करिअरच्या संधी याविषयी माहिती मिळेल आणि शंकाचे निरसन देखील होणार आहे.

या नवीन शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठात नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत बी.कॉम. (बीएफएसआय), भौतिकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) हे दोन नाविन्यपूर्ण चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. सेंटर फॉर रिसर्च ऑन स्कीम्स अॅण्ड पॉलिसी व महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सुरु होणाऱ्या या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना शिकाऊ प्रशिक्षणाची (अॅप्रेंटिसशिप) संधी मिळणार आहे. याशिवाय विद्यापीठाने गतवर्षी नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत संगणकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (कॉम्प्यूटर सायन्स), गणित शास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (मॅथेमेटीकल सायन्स) आणि सामाजिक शास्त्र प्रशाळेत बी.ए. (सोशल सायन्स) हे चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु केले आहेत. या पाच अभ्यासक्रमांची तसेच विद्यापीठाच्या विविध प्रशाळांमध्ये असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती आणि ओळख या कार्यशाळेत करून दिली जाणार आहेत. याशिवाय विद्यापीठातील सोयी – सुविधा, प्रयोगशाळा, पायाभूत सुविधा याबद्दल देखील विद्यार्थी आणि पालकांना माहिती दिली जाईल. कार्यशाळेत इलेक्ट्रॉनिक्स सेक्टर स्किल्स कौन्सील ऑफ इंडियाच्या पश्चिम विभागाचे संचालक मंगेश मिथे, प्रा. रमेश सरदार, प्रा. जयदीप साळी, प्रा. एस.आर. कोल्हे हे देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधतील.

या पाच पदवी अभ्यासक्रमांसाठी १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी पदवी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतील. या सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून www.nmu.ac.in या संकेतस्थळावर माहिती देण्यात आलेली आहे. यंदा प्रथमच विद्यापीठाने विद्यार्थी आणि पालकांमध्ये अधिक जनजागृती व्हावी यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. तरी प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे असे आवाहन अंतर्गत गुणवत्ता निर्धार कक्षाचे संचालक प्रा. समीर नारखेडे यांनी केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २४ (प्रतिनिधी) : श्री संत सद्‌गुरु सखाराम महाराज संस्थान अमळनेर येथून पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी निघालेल्या दिंडीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रा.से.यो. विभागाच्या वतीने 'प्लास्टीक मुक्त, कचरामुक्त दिंडी – हरित वारी निर्मळ वारी – स्वच्छ वारी' अभियान राबविण्यात आले.

रविवार दि. २३ जून रोजी श्री. क्षेत्र अमळनेर ते श्री.क्षेत्र पंढरपूर अशी वारी प्रस्थान झाली. रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी या दिंडीत सहभाग घेवून परिसरातील कचरा, प्लास्टीक जमा करून प्लास्टीक मुक्त वारीचा संदेश दिला. यावेळी श्री. संत सखाराम महाराज यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. फुगडी खेळून विद्यार्थ्यांनी दिंडींचा आनंद घेतला. यावेळी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे, अधिसभा सदस्य डॉ. संदीप नेरकर, प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी. जैन, रा.से.यो. जिल्हा समन्वयक डॉ.दिनेश पाटील, विभागीय समन्वयक डॉ. दिलीप गिन्हे, डॉ. मनीष करंजे, डॉ. हेमंत पवार, डॉ. लिलाधर पाटील, प्रा.रोशनी पाटील आदी उपस्थित होते. प्रताप महाविद्यालय अमळनेर व धनदाई कला महाविद्यालय अमळने या दोन महाविद्यालयांचा यात सहभाग होता.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २४ जून, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

<u>नवीन पदवी अभ्यासक्रमांची माहिती</u>

**शनिवारी पालेशा महाविद्यालयात विद्यार्थी – पालकांसाठी विद्यापीठातर्फे कार्यशाळा**

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २६ (प्रतिनिधी) : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रशाळांमध्ये सुरु झालेल्या पदवी अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती व्हावी याशिवाय विद्यापीठ प्रशाळांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती व्हावी यासाठी धुळे जिल्ह्यातील १२ वी आणि पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तसेच त्यांचे पालक यांच्यासाठी शनिवार दि. २९ जून रोजी धुळे येथील एम.डी. पालेशा महाविद्यालयात कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाच्या वतीने सकाळी १० वाजता एम.डी. पालेशा महाविद्यालयाच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यशाळेत प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांच्यासह या नवीन अभ्यासक्रमाची माहिती देणारे तज्ज्ञ प्राध्यापक संवाद साधणार आहेत. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. शिवाजी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांची उपस्थिती असणार आहे. या संवादामुळे विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमांची माहिती तसेच करिअरच्या संधी याविषयी माहिती मिळेल आणि शंकाचे निरसन देखील होणार आहे.

या नवीन शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठात नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत बी.कॉम. (बीएफएसआय), भौतिकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) हे दोन नाविन्यपूर्ण चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. सेंटर फॉर रिसर्च इन स्कीम्स अ‍ॅण्ड पॉलिसी व महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सुरु होणाऱ्या या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना शिकाऊ प्रशिक्षणाची (अ‍ॅप्रेंटिसशिप) संधी मिळणार आहे. याशिवाय विद्यापीठाने गतवर्षी नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत संगणकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (कॉम्प्यूटर सायन्स), गणित शास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (मॅथेमेटीकल सायन्स) आणि सामाजिक शास्त्र प्रशाळेत बी.ए. (सोशल सायन्स) हे चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु केले आहेत. या पाच अभ्यासक्रमांची तसेच विद्यापीठाच्या विविध प्रशाळांमध्ये असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती आणि ओळख या कार्यशाळेत करून दिली जाणार आहेत. याशिवाय विद्यापीठातील सोयी – सुविधा, प्रयोगशाळा, पायाभूत सुविधा याबद्दल देखील विद्यार्थी आणि पालकांना माहिती दिली जाईल. कार्यशाळेत प्रा. एस.एस. घोष, प्रा. रमेश सरदार हे विद्यार्थ्यांशी संवाद साधतील.

या पाच पदवी अभ्यासक्रमांसाठी १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी पदवी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतील. या सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून www.nmu.ac.in या संकेतस्थळावर माहिती देण्यात आलेली आहे. यंदा प्रथमच विद्यापीठाने विद्यार्थी आणि पालकांमध्ये अधिक जनजागृती व्हावी यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. तरी प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे असे आवाहन अंतर्गत गुणवत्ता निर्धार कक्षाचे संचालक प्रा. समीर नारखेडे यांनी केले आहे.

........................................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २६ जून, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी